स्वानुभव

अनुवादक - पं. दिनेशभाई शहा

स्वानुभव

(लेखक : श्री. बाबूलाल जैन)

— अनुवादक —

पं. दिनेशभाई शहा

एम.ए., एल.एल.बी.

— संपादिका —

डॉ. श्रीमती उज्ज्वला दिनेशचंद्र शहा

एम.बी.बी.एस., डी.सी.एच., डी.जी.पी.

— प्रकाशक —

वीतरागवाणीप्रकाशक

१५७/९, निर्मला निवास, सायन (पू.),

मुंबई – ४०० ०२२.

फोन : ०२२-२४०७ ३५८१

तिसरी आवृत्ति :	१६ एप्रिल २०११	१,००० प्रति
दोन आवृत्त्या		२,००० प्रति
		३,००० प्रति

दातार

डॉ. सुहास व डॉ. मोनिका शहा, मुंबई. १२,०००

– आमची प्रकाशने –

(१) जैनतत्त्व परिचय–मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्लिश	रु. १५/-
(२) कारण कार्य रहस्य–मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्लिश	रु. १५/-
(३) करणानुयोग परिचय–मराठी, हिन्दी, गुजराती	रु. १५/-
(४) पंचलब्धि–मराठी, हिन्दी, गुजराती	रु. १५/-
(५) भक्तामरस्तोत्र प्रवचन–मराठी	रु. १५/-
(६) सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड एवं अर्थसंदृष्टि–हिन्दी	रु. १२५/-
(७) सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड एवं अर्थसंदृष्टि–हिन्दी	रु. १५०/-
(८) सम्यग्ज्ञानचन्द्रिका लब्धिसार-क्षपणासार एवं अर्थसंदृष्टि–हिन्दी	रु. १००/-

— प्राप्तिस्थान —

वीतरागवाणीप्रकाशक

१५७/९, निर्मला निवास, सायन (पू.), मुंबई – ४०० ०२२.

फोन : ०२२-२४०७ ३५८१

E-mail : ujwaladinesh@yahoo.com

किंमत : रु. ६/-

प्रकाशकाचे मनोगत

काही महिन्यांपूर्वी, भोपाळ येथील १९७५ साली यात्रेच्या वेळी ओळख झालेला एक गृहस्थ माझ्या घरी दत्त म्हणून येऊन उभा राहिला. अर्थातच आलेल्या अनाहुत पाहुण्याचे योग्य ते आगत-स्वागत झाले. जाताना तो म्हणाला मी पुन्हा आपला पाहुणचार घेणार आहे आणि तो शब्दाला जागला.

सुमारे १५ दिवसांनंतर तो आला, त्याने आपला शब्द खरा केला. एवढे सर्व चऱ्हाट सांगण्याचे प्रयोजन हे आहे की त्याने जाताना मला 'स्वानुभव' आणि 'परमात्मा बननेका विज्ञान' ही दोन पुस्तके साधर्मी या नात्याने भेट म्हणून दिली. छोटीशीच पुस्तके म्हणून थोडीशी दुर्लक्षिली गेली.

परंतु जेव्हा ती पुस्तके वाचली तेव्हा 'अहो ! ही तर स्वानुभव करण्याची - परमात्मा बनण्याची गुरुकिल्लीच आपल्या हाती गवसली आहे' असा अहोभाव आल्याशिवाय राहिला नाही. दोन्ही पुस्तके वारंवार वाचली आणि मनोमन ही अमोल, अप्रतिम व अलौकिक गोष्ट सर्वांप्रती पोहोचावी अशी इच्छा झाली. वास्तविक ही पुस्तकं हिंदी भाषेत असल्याने ती मराठी भाषिक बांधवांना समजावीत ह्या हेतूने लगेच त्यांचे मराठीत भाषांतर देखील केले. परंतु ती छापणार कोण? याचा विचारदेखील केला नाही.

परंतु काही दिवसांनी आम्ही उभयता पतिपत्नींनी 'वीतरागवाणीप्रकाशक' ही प्रकाशन संस्था सुरु केली व त्याद्वारे स्वखर्चाने **'पत्राद्वारे जैन तत्त्वपरिचय'** आणि **'भक्तामरस्तोत्र प्रवचन'** ही पुस्तकं छापली. त्या पुस्तकांचे अंतरंग व सुबक व देखणे बहिरंग पाहून चेंबुरचे श्री. अरविंद मोतीलाल दोशी व माटुंग्याचे श्री. देवेन्द्र जे. चांगाणी ह्यांनी स्वतःहून आर्थिक मदत केली व त्यामुळे 'स्वानुभव' व 'परमात्मा कसे बनाल!' ही दोन पुस्तके छापता आली.

ही पुस्तके छापण्याची इच्छा असल्याने ह्या पुस्तकांचे लेखक दिल्लीनिवासी श्री. बाबूलाल जैन, कलकत्तावाले ह्यांना परवानगीसाठी पत्र टाकले. त्यांनी नुसतीच परवानगी दिली नाही, तर आपण फार चांगले कार्य करीत आहात म्हणून पुस्तीसुद्धा जोडली व आणखीन एक 'सम्यग्ज्ञान' नावाचे पुस्तकही पाठवले आणि आपणास योग्य वाटत असल्यास तेही मराठीत भाषांतर करुन छापावे अशी सदिच्छा व्यक्त केली. त्यांनी जो आशीर्वादात्मक पाठिंबा दिला त्याबद्दल त्यांचा मी व्यक्तिशः अत्यंत ऋणी आहे. साहजिकच आहे, जिनवाणीचा प्रचार - प्रसार होत असताना कोण आडकाठी आणेल? श्री. बाबूलाल जैन ह्यांचे आभार मानावेत तेवढे थोडे आहेत.

कोणतेही चांगले काम करताना सर्वांचे सहकार्य आपोआपच उत्कृष्टपणे लाभते. मूळ किंमत जास्त पडत असूनसुद्धा आणि क्वालिटीमध्ये (पुस्तकाच्या दर्जामध्ये) कोठेही तडजोड न करता पुस्तके अत्यंत कमी किंमतीत सर्वांना उपलब्ध करुन देण्याची वृत्ती पाहून "शेठ पब्लिशर्स" चे श्री. दिपक शेठ व श्री. किरीट शेठ ह्या दोन्ही बंधुंनी अक्षरशः कोणताही नफा न कमविता पुस्तके बनविण्यात आम्हास अत्यंत मोलाची मदत केली. त्यांचेही आभार मानण्यात मला धन्यता वाटते. त्यांच्या येथील श्री. उमेशभाई त्रिवेदींनी देखील तत्परतेने वेळोवेळी मदत केली. तेही आभारास पात्र आहेत.

केवळ ह्या पुस्तकाचेच कव्हर नव्हे तर आत्तापर्यंत छापत आलेल्या चारही पुस्तकांच्या कव्हरांचे 'आर्टवर्क' मोठ्या कलात्मकतेने व आत्मियतेने एवढेच नव्हे तर विनामूल्य व वेळेवर श्री. अभिजित शहानी करून दिले. अशातऱ्हेने त्यांचे व त्यांचे पार्टनर श्री. चंदन राज ह्यांचे आभार तर मानावे वाटतात, पण मन संकोचते. कारण ह्या सर्वांकडे पाहता अशा दिवसातही अशा उदार मनोवृत्तींची माणसं अस्तित्वात आहेत हे पाहून सर्वांचे आभार मानून आपण त्यांचा अपमान तर करीत नाही नां? असे वाटते.

ह्या आणि प्रत्येक पुस्तकाच्या 'प्रूफ रिडींग' सारख्या किचकट कामामध्ये सौ. उज्ज्वलाने अतोनात परिश्रम घेऊन फार मोठी मोलाची मदत केली आहे. तिने जर हातभार लावला नसता तर ह्या पुस्तकांना कोणते रुप प्राप्त झाले असते ह्याचा विचारही करता येत नाही. कारण पुस्तक बनण्याच्या प्रत्येक बाबतीत तिची अत्यंत मदत झाली आहे.

तसेच दातारांचेही आभार मानून माझे मनोगत पुरे करतो.

— दिनेशभाई शहा

– उद्‌बोधन –

'इसमें सदा रतिवंत बन, इसमें सदा संतुष्ट रे।

इससे हि बन तू तृप्त, उत्तम सौख्य हो जिससे तुझे॥

ही सम्यक्त्वाची आणि स्वानुभवाची गोष्ट खूप चांगली आहे....... जिला आपले लक्ष्य बनविल्याने जन्म-मरण मिटावे-अशी ही अलौकिक गोष्ट आहे. ही स्वानुभवकलाच संसार-समुद्रातून तरुन जाण्याची कला आहे, भले इतर सर्व विद्या येवोत अथवा न येवोत. ह्या स्वानुभव कलेला न जाणणारा इतर अनेक कला भले जाणत असेल, तरी देखील संसार-समुद्र तरुन जाऊ शकत नाही, मोक्षाकरिता त्याची एकदेखील कला उपयोगी पडत नाही आणि स्वानुभवाच्या एका कलेसच जाणणारा इतर कला कदाचित जाणतही नसेल तरीदेखील स्वानुभवाच्या जोरावर तो संसार तर तरुन जाईलच व मोक्षही साधेल. स्वानुभवाच्या जोरावर त्याला केवलज्ञानाची अशी महाविद्या उमलेल/विकास पावेल की त्यामध्ये जगातील सर्व विद्यांचे ज्ञान सामावले जाईल.

अरे! आयुष्य थोडे आहे, बुद्धी अल्प आहे आणि श्रुताला तर पार (मर्यादा) नाही; अशावेळेला बा जीवा! तुला तेच शिकणे योग्य आहे की ज्यायोगे भव-समुद्र तरला जाईल. इतर निष्प्रयोजन गोष्टींना सोडून मूळ प्रयोजनभूत अशा ह्या गोष्टीला जाण की ज्याच्या ज्ञानामुळे हा आत्मा हा भवसमुद्र तरुन जाईल. ह्या संबंधी एक दृष्टांत देत आहे –

कोणी एक विद्वान पंडित नावेत बसून जात होता - मध्येच नावाड्याशी बोलण्यासाठी त्याने विचारले –

"काय रे बाबा, तुला संगीत येते का?"

नावाडी म्हणाला – "नाही बुवा."

थोड्या वेळाने त्या पंडिताने विचारले – "अरे, तुला संस्कृत-व्याकरण येते का? ज्योतिष येते का? गणित येते का?"

नावाडी म्हणाला – "नाही बुवा."

शेवटी पंडिताने विचारले – "कमीत कमी लिहायला-वाचायला तरी येतच असेल?"

नावाडी म्हणाला – “नाही बुवा! आमचे तर काय ही नदी भली आणि आमची नाव भली.... आपल्याला तर बुवा फक्त पाण्यात पोहायला तेवढे येते.”

तेव्हा उपहासाने पंडित म्हणाला – “अरे वा! म्हणजे तुझे आयुष्य तर पाण्यातच गेले म्हणायचे! आम्ही तर न्याय, कायदे, संस्कृत, व्याकरण, संगीत, गणित, ज्योतिष सर्व काही जाणतो”

नावाडी म्हणाला – “फार चांगली गोष्ट आहे साहेब! आम्हाला ह्याच्याशी काय देणे घेणे? आपल्याला तर आपल्या नावेशी काम आहे.” अजून अशा गप्पा चालल्याच होत्या एवढ्यात जोरदार वादळ सुटले आणि नाव हेलकावे खाऊ लागली, दिशाहीन होऊन पाण्याच्या प्रवाहात वेगाने वाहू लागली. तसेच ती बुडेल की काय अशी परिस्थिती निर्माण झाली.

तेव्हा नावाड्याने विचारले – “काय पंडितजी, तुम्हाला पोहायला येते का नाही?”

पंडितजी अगोदरच घाबरले होते ते म्हणाले – “नाही बाबा! मला इतर सर्व येते फक्त एक पोहायलाच येत नाही.”

नावाडी म्हणाला – “आपण सर्व काही शिकलात, परंतु पोहायला शिकला नाही. ही नाव तर आत्ता बुडेल, मी तर पोहणे जाणतो, म्हणून मी तर पोहून पैलतीरावर पोहोचेन, परंतु आपण तर ह्या नावेबरोबरच बुडाल आणि आपल्याबरोबर आपल्या सर्व विद्यादेखील पाण्यात बुडतील”

– हा तर एक दृष्टांत आहे. तसे तर ज्याला हा भवसमुद्र पोहून जावयाचे आहे, त्याला स्वानुभवाची विद्या शिकलीच पाहिजे. इतर प्रयोजनाकरिता खूप जाणकारी (ज्ञान) मिळवेल परंतु अंतरंगामध्ये स्वभावभूत चैतन्य वस्तु काय आहे? हे जर जाणले नाही तर बाह्य जाणकारी त्याला (वरील पंडिताप्रमाणे) संसारसागरातून तरुन जाण्यासाठी उपयोगी ठरणार नाही आणि ज्याने बाह्य गोष्टींचा महिमा सोडून अंतरंगामध्ये चैतन्य विद्या साधली आहे, त्याला बाह्य अन्य विद्या कदाचित कमी अवगत असतील तरीदेखील (नावाड्याप्रमाणे) स्वानुभवविद्येद्वारे तो भवसमुद्र तरुन जाईल आणि तीन लोकामध्ये सर्वश्रेष्ठ अशा केवलज्ञान विद्येचा तो स्वामी होईल.

बा जीवा! तुला स्वानुभव कला शिकविणारे आणि संसारसागरातून तारणारे संतधर्मात्मा भेटले आहेत तेव्हा आता बाह्य कलांना जाणण्याचे महत्त्व सोडून स्वानुभवकलेचे महत्त्व जाण! अरे, ह्याशिवाय ह्या संसाराचा

शेवट होणार नाही. ह्या स्वानुभवासमोर जगातले इतर सर्व शिकणे-सवरणे बेकार आहे. एका क्षणाचा स्वानुभव हजारो वर्षांच्या शास्त्रपठनापेक्षा देखील अधिक श्रेष्ठ आहे, म्हणून तू त्याला जाण. धर्मीला आत्म्याच्या ज्ञान-ध्यानाने खूप शुद्धता वाढत जाते आणि असंख्यात गुणी निर्जरा होत जाते. बाह्य गोष्टींच्या ज्ञानाचा उघाड वाढो, अथवा न वाढो; परंतु अंतरंगामध्ये चैतन्य-अनुभवाची ज्ञान शक्ती तर त्याची वाढत जाते आणि आवरण एकदम तुटत जाते. एका क्षणाच्या स्वानुभवाने ज्ञानीची जेवढी कर्म तुटतात, तेवढी कर्म अज्ञानीच्या लाखो उपायांनीदेखील तुटत नाहीत. अशी सम्यक्त्वाची व स्वानुभवाची काही आगळी अचिंत्य महिमा आहे - असे जाणून हे जीवा! तू ह्याची आराधना करण्यासाठी सज्ज हो.......

– स्वानुभव –

आज विश्वामध्ये सर्वत्र दुःख-पीडा आहे, अशांती आहे, हाहाकार आहे. **प्रत्येक जीव सुख इच्छितो आणि त्याचा प्रत्येक प्रयत्न सुख प्राप्तीसाठीच असतो, परंतु दुःखाशिवाय त्याला दुसरे काहीही मिळत नाही.** हा जीव ज्याला सुख मानून त्यामध्ये अडकतो, ते वास्तविक सुख नाही. कारण जे आपल्या बरोबर अथवा मागोमाग दुःख घेऊन येते, त्याला सुख म्हटले जात नाही. **खरे सुख तर आपल्या आत्म्याला आपल्या रुपाने पाहणे-जाणणे आणि त्या रुपाने राहणेच आहे.** परंतु ज्ञानस्वरुप त्या आत्म्याला न ओळखता **हा जीव अज्ञानी बनून ह्या संसाररुपी दुःखसागरामध्ये परिभ्रमण करत आहे.**

जीवाच्या पीडेचे आणि दुःखाचे कारण आहे – राग-द्वेष अथवा क्रोध-मान-माया-लोभ. हा जीव दुःखी तर आपल्या राग-द्वेषामुळेच आहे. परंतु असे मानत आहे की दुसऱ्या व्यक्ती अथवा पदार्थामुळे किंवा धन-संपत्ती वगैरेच्या अभावामुळे स्वतः दुःखी आहे. म्हणून राग-द्वेष मिटविण्याचा तर उपाय करीत नाही, उलट त्या गोष्टींना प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो की ज्यांच्या प्राप्तीनंतरदेखील दुःख दूर होत नाही. राग-द्वेष दुःखाची कारणं आहेत आणि राग-द्वेषाचे कारण आहे ह्या जीवाचे आपल्या चैतन्यस्वभावाला न जाणणे-जीवाची आपल्या स्वरुपाबद्दलची अज्ञानता, ज्यामुळे तो शरीरादीमध्ये आपलेपणा मानत आहे. **अशाप्रकारे जीवाच्या पीडेच्या व दुःखाच्या मुळाशी ह्याची अज्ञानताच आहे** आणि ती अज्ञानता त्याच्या जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये प्रगट होत आहे. सर्वात प्रथम त्या अज्ञानतेच्या विविध प्रकारांचाच विचार करु.

१. **सर्वात पहिली आणि मौलिक चूक हीच आहे** की जरी हा जीव अनंतगुणवाला चैतन्य तत्त्व-ज्ञानशरीरी आहे. तरी देखील ह्या मूर्तिक जड शरीराला, पुद्गलाला ह्याने आपले असणे-आपले अस्तित्व मानले आहे. ते चैतन्यतत्त्व अमूर्तिक आहे, म्हणून ह्या चर्मचक्षुंनी दिसू शकत नाही, ते फक्त स्वसंवेदनगम्य आहे, आपल्या अनुभवानेच जाणले जाऊ शकते. त्याला तर ह्या अज्ञानीने ओळखले नाही आणि डोळ्याच्या माध्यमातून जेव्हा बाहेर डोकावले तेव्हा ह्याला हे स्थूल शरीर दिसले. स्वतः स्वतःला न ओळखण्याच्या चुकीमुळे ह्याने ह्या शरीरालाच आपलेरुप मानले आणि ह्या मान्यतेमुळे संसारवेल वाढतच राहिली.

आत्मा व शरीरामध्ये जो भेद आहे तो स्वतः सिद्ध आहे तो भेद ह्याला निर्माण तर करावयाचा नाही. फक्त त्याचे ज्ञान करावयाचे आहे आणि ते भेदज्ञान करुन त्या एकमात्र चैतन्यामध्ये सर्वस्व स्थापित करावयाचे आहे. जर ज्यारुपाने हा नाही, त्यारुपाने तो स्वतःला तसा अनुभव करु शकतो, तर ज्यारुपाने हा वास्तविक आहे त्यारुपाने तो का अनुभव करु शकणार नाही? अनुभव करणारा तर हा स्वतःच आहे.

जशी अहंबुद्धी (आपलेपणा-एकत्वबुद्धी) ह्याची शरीरामध्ये आहे तशी तर चेतनेमध्ये असली पाहिजे आणि जशी परबुद्धी अंगावरील वस्त्र वगैरे मध्ये आहे, तशी ह्या शरीरामध्ये असली पाहिजे.

शरीराच्या स्तरावरुन तर ह्याला अनुभूती आहे – शरीरामध्ये आपल्या सत्तेची अनुभूती होत आहे की 'हाच मी आहे'. शरीरा ऐवजी हा 'मीपणा' चेतनेमधून उठला पाहिजे कारण हा वास्तविक चैतन्यच तर आहे, शरीर तर जड आहे. शरीराच्या स्तरावरुन तर ह्याला भेदविज्ञान देखील आहे. आपल्या शरीर, घर, धन, वैभव, स्त्री, पुत्र वगैरेंनाच फक्त आपले मानतो, कोठल्या दुसऱ्यांच्या शरीरादिकांना नाही. हेच भेदविज्ञान ह्याला चेतनेच्या स्तरावर व्हायला पाहिजे की अनंतगुणवाला हा चेतन पदार्थ तर 'मी' आहे आणि हे शरीर आणि बाकी सर्व पदार्थ 'पर' आहेत, अन्य आहेत, दुसरे आहेत.

शरीराच्या स्तरावर ज्या ज्या पदार्थांचा संयोग होतो या सर्वांमध्ये हा आपलेपणा मानतो. जे शरीर ह्याला मिळाले आहे तद्रुप – स्त्री, पुरुष, नपुंसक रुप किंवा मनुष्य, देव, नारकी, पशुरुप स्वतःला मानतो अथवा स्वतःला श्रीमंत-गरीब, रोगी-निरोगी, सुंदर-कुरुप, दानी-याचक, हुषार-मूर्ख, गृहस्थ-मुनी वगैरे मानतो. ह्या उलट, जर ह्याने आपल्या स्वभावाला जाणले असते की मी तर चैतन्य आहे आणि हे शरीरादिक अथवा धन,

स्वास्थ्य, सौंदर्य वगैरे तर कर्माच्या उदयजनित संयोग आहेत, तर मग ह्याचा त्यांच्यामध्ये अहंपणा झाला नसता. त्यांच्या असण्याने अथवा नसण्याने हा सुखी-दुःखी झाला नसता. परंतु ह्याची तर पर्यायीमध्येच अहंबुद्धी होत आहे, आपल्या चैतन्य ज्ञानस्वभावामध्ये आपलेपणा ह्याला निर्माण होत नाही.

२. जीवाची दुसरी अज्ञानता ह्या मिथ्या मान्यतेवर आधारित आहे की, सुख-दुःख परामधून येते आणि परच मला कषाय करायला भाग पाडतात. वास्तविक परिस्थिती अशी आहे की, परपदार्थ कधीही सुख-दुःखाचे कारण असत नाही. जीवाच्या सुख-दुःखाचे मूळ कारण तर कषायांचा, इच्छांचा - विकल्पांचा अभाव किंवा सद्भावच आहे. **अधिक इच्छावाला प्राणी दुःखी आणि कमी इच्छावाला अपेक्षाकृत सुखी दिसून येतो.**

एका इच्छेची पूर्ती झाली असता जो सुखाचा आभास झाल्यासारखा वाटतो, ते सुख वास्तविक त्या परपदार्थामधून येत नाही, – जो (पदार्थ) इच्छापूर्ती झाल्याने मिळाला आहे. परंतु तत्संबंधी इच्छेचा त्या समयी जो अभाव झाला आहे, त्या अभावामुळे ते सुख ,आले आहे. शिवाय त्या विशिष्ट समयी देखील एका इच्छेचाच तर अभाव झाला आहे, इतर अनंत इच्छा तर रांग लावून उभ्याच आहेत - म्हणून हा जीव निरंतर दुःखीच रहातो. वस्तुस्थिती तर हीच आहे परंतु अज्ञानी त्या सुखाला, इच्छेच्या अभावजनित न मानता अशी मान्यता करतो की परपदार्थामधून हे सुख आले आहे आणि आपल्या ह्या खोट्या / चुकीच्या मान्यतेमुळे ह्या परपदार्थांना - शरीर, स्त्री, पुत्र, धन, वैभव, घर, दुकान वगैरेना वाढविण्याच्या सतत धुंदीत मग्न रहातो.

अशातऱ्हेने लागोपाठ इच्छा करण्याचे प्रयोजन ह्याचे चालूच राहते. मायाचार वगैरेद्वारे देखील इच्छांची पूर्ती करण्याचा लोभ ह्याला निरंतर चालूच राहतो. पूर्ती न झाल्यास क्रोध कषाय आणि पूर्ती झाल्यास मान कषाय करतो. अशा प्रकारे अज्ञानीचे कषाय करण्याचे प्रयोजनदेखील चालूच राहते.

जीव स्वतः कषायरुप परिणमन करतो आणि मानतो असे की, पराने-दुसऱ्याने मला कषाय करायला लावले. परंतु वस्तुस्वरुप असे नाही, कोणी दुसरा कषाय करायला लावत नाही. **कषाय होण्याची सर्व जबाबदारी आपली स्वतःची आहे.** दुसऱ्यांचे अवलंबन घेऊन आपणच कषायरुप परिणमन करतो. पराचे अवलंबन देखील आपणच घेतले आहे आणि कषायरुप परिणमन देखील आपणच केले आहे. ज्याअर्थी पराचे अवलंबन घेतले आहे त्याअर्थी उपचाराने असे म्हटले जाते की त्याने क्रोध करविला वगैरे. परंतु असे म्हणणे मात्र उपचार आहे आणि उपचार तर वास्तविक खोटाच असतो.

वस्तुस्वरुपाला न जाणता अज्ञानी असेच मानतो की इतराने कषाय करायला लावले, म्हणून स्वतःला तर बदलण्याचा प्रयत्न करीत नाही, उलट इतरांना बदलण्याचा प्रयत्न करतो. हे विसरतो की दुसऱ्यांचे परिणमन माझ्या आधीन नाही.

"माझे सुधारणे–बिघडणे तर माझ्या स्वतःच्याच आधीन आहे. पर मला सुखी-दुःखी करु शकत नाही. पर मला कषाय करायला लावत नाही." अशाप्रकारे जरी मान्यता ठीक झाली तरी देखील परापासून बचाव केवळ एवढ्यासाठी केला जातो की अजून माझ्यामध्ये आत्मबळाची एवढी कमतरता आहे की पराच्या उपस्थितीमध्ये मी त्याला लक्ष्य बनवून आपला बिघाड करुन घेतो. उदाहरणार्थ - जसे अशक्त माणूस थंडीला वाईट मानून नव्हे तर आपल्या स्वास्थ्याच्या कमजोरीच्या कारणानेच त्यापासून आपला बचाव करतो.

३. जीवाची तिसरी अज्ञानता–परामध्ये इष्ट–अनिष्टपणाची कल्पना करुन राग-द्वेष करणे ही आहे. हा जीव 'स्व'ला विसरुन निरंतर 'परा'मध्येच जोडला गेला आहे. त्या पर पदार्थांमध्ये, जे ह्याच्या अनुकूल असतात, त्यांच्यामध्ये हा इष्टपणाची कल्पना करुन राग करतो आणि जे प्रतिकूल असतात, त्यांच्यामध्ये अनिष्टपणाची कल्पना करुन द्वेष करतो. इष्ट-अनिष्टपणा हा काही पदार्थांचा गुणधर्म तर नाही फक्त ह्याच्या द्वारे केली गेलेली कल्पनाच आहे. जर इष्ट-अनिष्टपणा वस्तुचा गुणधर्म असता तर एखादी वस्तु सर्वांना इष्टच वाटायला हवी होती आणि एखादी अन्य वस्तु सर्वांना अनिष्टच वाटायला हवी होती. परंतु सर्वांना इष्ट अथवा अनिष्ट वाटण्याचे तर दूर राहो, एकच वस्तु एकाच व्यक्तीला कधी इष्ट वाटते तर कधी अनिष्ट! भूक लागली असेल तर जे भोजन खूप स्वादिष्ट आणि रुचकर लागते, भूक भागल्यानंतर तेच भोजन पाहण्याची सुद्धा इच्छा होत नाही.

म्हणून इष्ट-अनिष्टपणा जीवामध्ये उत्पन्न होणाऱ्या खोट्या कल्पनाच आहेत. सर्वत्रच आपल्या सुख-दुःखाचे अथवा कषायांचे कारण वस्तु अथवा परिस्थिती नसून त्यामध्ये आपल्याकडून उत्पन्न केलेले विकल्प किंवा कल्पनाच आहेत. आपण भले इष्टपणाचा विकल्प निर्माण करुन स्वतःला सुखी मानले किंवा भले अनिष्टपणाचा विकल्प उभा करुन स्वतःला दुःखी मानले, तरी वास्तविक आनंद तर निर्विकल्प राहण्यामध्येच आहे. आपण कोणत्याही परिस्थितीत असो, आपण त्यामध्ये कोणतेही विकल्प उभे करु नयेत आणि असे तर आपण करु शकतो.

प्रत्येक समयाला आपल्या मनामध्ये काही ना काही चालूच असते. मनातील विकल्पांनासुद्धा जाणणारा जो साक्षी-आत्मा-अंतरंगात आहे, त्याची तर आम्हाला ओळख नाही, मनालाच आम्ही आपले अस्तित्व मानले आहे. आपण प्रत्येक क्षणी एक तर भूतकाळातील घटनांच्या स्मृतीमध्ये किंवा भविष्याच्या काही योजना किंवा इच्छा व चिंतेमध्ये अडकलो आहोत, न।हीतर इतर अनेक फालतू विचारांमध्ये! हे विचार किंवा विकल्प कोणत्याही प्रकारे सार्थक नाहीत.

वर्तमानकाळी तर हे अशांती देऊन जातातच, भविष्याकरितासुद्धा व्यर्थ कर्मबंध करतात. आत्मशांती मिळविण्या करिता सर्वात पहिल्यांदा आपणास विकल्पांची निरर्थकता लक्षात आली पाहिजे की त्या विकल्पांच्या आधीन काम होण्याचा नियम नाही आणि त्याबरोबर हे देखील लक्षात आले पाहिजे की आपणाकडून उभा केलेला एकही विकल्प व्यर्थ जात नाही, प्रत्येकाची आपणास भरपूर किंमत चुकवावी लागते.

भूतकाळ तर निघून गेला, तो तर मुडदा आहे त्याच्या बाबतीत आपण का विचार करावा? भविष्याच्या बाबतीत विचार करणे देखील निरर्थक आहे. कारण कोणतेही काम आपल्या इच्छेच्या आधीन तर असत नाही. जर आपल्या विकल्पांच्या आश्रित काहीही नाही तर मग आपण फक्त वर्तमानकाळातच का न रहावे? जे काही वर्तमानकाळात घडत आहे त्याला फक्त पहात-जाणत रहावे.

४. **चौथी अज्ञानता ह्याची कर्तृत्व-बुद्धी आहे. हा आत्मा आहे तर ज्ञानस्वरुप, ज्ञाता-दृष्टारुप राहण्याशिवाय काहीही तर तो करू शकत नाही, परंतु हा स्वतःला ओळखत नाही.** फक्त ज्ञानरुप रहाण्याच्या आपल्या कार्याला व पुरुषार्थाला जाणत नाही, म्हणून पर्यायामध्ये जे काही घडत आहे, ते होत तर आहे निमित्तनैमित्तिक संबंधाने, परंतु हा त्या सर्वांचा करणारा मी आहे असे मानतो. ह्या मिथ्याकर्ताबुद्धीच्या कारणाने ह्याचा सारा पुरुषार्थ ज्ञातारुप रहाण्यामध्ये नव्हे तर चोवीस तास काही ना काही खटपट करण्यामध्येच लागलेला असतो.

वस्तुस्थिती ही आहे की ह्याच्या करण्याच्या आधीन काही देखील नाही. जर परपदार्थांचे परिणमन ह्याच्या विकल्पांच्या किंवा ह्याच्या क्रियांच्याच आश्रित असते तर ह्याची नेहमी सर्व इच्छांची पूर्तता व्हायला पाहिजे होती परंतु असे झालेले आतापर्यंत कधी पाहण्यात आले नाही. कदाचित कधी तरी इच्छा आणि कर्माच्या उदयाचा संयोग जमून आला तर हा म्हणतो की,

हे मी केले. आपल्या कर्तापणाच्या मिथ्या मान्यतेच्या विस्तारामध्ये ह्याला असे वाटत असते, की जणु सारे जग ह्याच्या चालविण्यामुळेच चालत आहे. जर हा कर्माचे कार्य करणे सोडून (ज्याला तो वास्तविक करु शकत नाही, केवळ स्वतः कल्पनेत मानतो की मी करतो) तसेच ह्या खोट्या मान्यतेला सोडून फक्त ज्ञातापणे राहिला, तरी देखील साऱ्या जगाचे कार्य चालूच राहील, ते तर कधीच संपणारे नाही, हां ह्या अज्ञानीचे संसारपरिभ्रमण संपेल. जन्मोजन्मीची ह्याची सर्व दुःखं नष्ट होतील, परंतु ही गोष्ट ह्याच्या डोक्यात शिरतच नाही.

५. **पाचवी अज्ञानता भगवानाला कर्ता मानण्याची आहे.** आपल्या इच्छेप्रमाणे ह्याला कर्माचे कार्य होताना दिसते, तेव्हा हा म्हणतो की मी केले आणि कदाचित स्वतःकडून होत नाही असे लक्षात आले, आपल्या आशांवर पाणी पडत आहे हे समजताच, तो देवी-देवतांना आपल्यापेक्षा अधिक शक्तीशाली समजून त्यांच्याजवळ नवस बोलण्यास पोहोचतो की – "माझे अमुक काम कर, हे दे, ते दे"

एवढेच काय, वीतराग भगवानाच्या मंदिरामध्ये देखील ह्याच संसार-शरीर-भोगांच्या अभिप्रायासह पोहोचतो आणि तेथेही सौदेबाजी करतो – "तुम्ही मला दहा लाख दिले तर मी चार छत्र चढविन!" (अशी प्रवृत्ती, अशा मान्यताच आपल्या जीवनात लाचलुचपतीचे कारण बनल्या आहेत.) **धारणा तर तीच विपरीत आहे, ती चालू आहे. एक तर हा स्वतः कर्ता बनतो किंवा मग भगवानाला कर्ता बनवितो आणि विचार करतो कीं भगवान माझ्या सर्व इच्छा पूर्ण करेल.** अथवा पुन्हा हा अज्ञानी असे समजतो की, यथायोग्य पुण्याच्या उदयामुळे सारी अनुकूल सामुग्री प्राप्त होते, म्हणून हा पुण्यबंध करण्याकरिताच वीतरागी देवांची उपासना करतो आणि अशा तऱ्हेने संसाराचीच इच्छा करत राहतो.

आत्मिक सुखाची प्राप्ती तर आत्मदर्शनानेच होते. जेवढे कषाय कमी होतील तेवढे सुख आणि जेवढे कषाय बाकी राहतात तेवढे दुःख आहे. म्हणून सुखाकरिता कषायांच्या नाशाचा उपाय करायला पाहिजे होता परंतु ह्याचा तर संसार-शरीर-भोगांच्या प्राप्तीचाच अभिप्राय आहे. **म्हणून हा मंदिरामध्ये सुद्धा ही मान्यता ठेवूनच जातो की देवी-देव सुख वाटतात. ह्याचा सर्व देवांमध्ये समताभाव आहे कोणाचीही पूजा करवून घ्या! सुदेव असो-कुदेव असो, धरणेंद्र-पद्मावती असो, कोणीही असो!**

६. **सहावी अज्ञानता वीतरागी देव-गुरु-शास्त्र यांच्या संबंधी आहे.** जरी ह्याला कधी खऱ्या देव-गुरु-शास्त्राची प्राप्तीदेखील झाली आणि ह्याचे मोक्ष-

प्राप्तीचे ध्येय देखील तयार झाले, तरीदेखील हा देव-शास्त्र-गुरु मध्येच अडकतो. तेथे देखील ह्याचे अज्ञान लपून राहिले नाही.

आचार्यांनी सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्राला मोक्षाचा मार्ग म्हटले आहे. आपल्याला निजरुप, ज्ञाता-दृष्टारुप श्रद्धान करणे सम्यग्दर्शन आहे, आपल्या निजरुपाला जाणणे सम्यग्ज्ञान आहे आणि ज्ञाता-दृष्टारुप राहणेच सम्यक् चारित्र आहे. ह्या तिन्हीची एकताच मोक्षमार्ग आहे आणि वीतरागी देव-गुरु-शास्त्र त्या मोक्षमार्गाच्या प्राप्तीमध्ये निमित्त किंवा माध्यम असतात. देवदर्शनाच्या माध्यमातून जीवाला आत्मदर्शन करावयाचे होते, गुरुदर्शनाने देखील आत्मदर्शन करावयाचे होते आणि शास्त्रांद्वारे देखील आपल्या आत्म्याचे स्वरुप समजून त्या आत्म्याला आपल्या अंतरंगात शोधायचे होते.

परंतु अज्ञानीने तर देवदर्शन पूजा-भक्ती करून त्यांच्यावर श्रद्धा केल्याने स्वतःला सम्यग्दृष्टी मानले, शास्त्रज्ञानाने स्वतःला सम्यग्ज्ञानी मानले आणि गुरुच्या बाह्य शुभ क्रिया-व्रत, तप, उपवास वगैरे – ह्यांनाच मोक्षमार्ग मानून व त्यांना आत्मसात करुन त्यामुळे स्वतःला सम्यक्चारित्रवान मानले. **परंतु खऱ्या मोक्षमार्गाचा शोध ह्याने केलाच नाही.** शास्त्रांचा ह्याने खूप अभ्यास केला. त्यामध्ये असे कथनसुद्धा आले आहे की, **"द्रव्यलिंगी मुनींना खऱ्या देव-शास्त्र-गुरुंना मानून देखील, अकरा अंगापर्यंत अध्ययन करुन देखील, शुभ क्रियांचे पालन व परिषह सहन करण्याची पराकाष्टा करुनदेखील मोक्षमार्ग झाला नाही, म्हणून मोक्षमार्ग कोणता तरी वेगळाच आहे."** ह्या कथनावर ह्याने ध्यानच दिले नाही.

शास्त्रांमध्ये देव-गुरु-शास्त्राच्या भक्तीला व स्वाध्यायाला शुभ राग व पुण्य बंधाचे कारण आणि बंधाला संसाराचे कारण म्हटले आहे. आत्मदर्शनाला संवर-निर्जरेचे व संवर-निर्जरेला मोक्षाचे कारण म्हटलेले आहे. **परंतु अज्ञानीने पूजा-भक्ती व स्वाध्यायानेच मोक्ष मानला आहे आणि अशातऱ्हेने बंधालाच संवर-निर्जरा मानून तत्त्वांचे खरे श्रद्धान केले नाही आणि शुभरागामध्येच धर्म मानून आचार्यांच्या अभिप्रायाकडे ध्यान दिले नाही.** आचार्यांनी देव-गुरु-शास्त्राच्या श्रद्धानाला कोठे सम्यक्त्व म्हटलेदेखील आहे तेव्हा त्या कथनाला योग्य तऱ्हेने समजून घेतले पाहिजे की सम्यक्त्व तर निश्चयाने आत्मदर्शनच आहे. परंतु आत्मदर्शनामध्ये देव-शास्त्र-गुरु माध्यम असतात म्हणून त्यांच्या श्रद्धानालासुद्धा व्यवहाराने सम्यक्त्व म्हटले आहे आणि वास्तविक माध्यमदेखील ते आपणासाठी तेव्हाच बनतील जेव्हा आपण त्यांना माध्यम बनवू.

देव-शास्त्र-गुरुंच्या माध्यमातून आत्मदर्शन करावयाचे आहे. **जर केवळ देव-शास्त्र-गुरुंमध्येच अडकून राहिलो तर फक्त पुण्य-बंध होईल आणि जर त्यांना माध्यम बनवून आत्मदर्शन करु तर तो मोक्षमार्ग बनेल. शास्त्रांमध्ये विवक्षा-भेदाने अनेक ठिकाणी अनेक प्रकारची कथनं आढळतात. त्यांना व्यवस्थित अर्थासह समजून बुद्धीमध्ये चांगल्या तऱ्हेने समजून घेतले पाहिजे की कोठे कोणत्या विवक्षेने/अपेक्षेने कथन केले गेले आहे.**

स्वाध्यायासंबंधी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की – भगवान आचार्यांनी तर ग्रंथांमधून वर्णन केले आहे की शरीर व आत्मा वेगवेगळे आहेत. परंतु आपणास नीट लक्षात घ्यायचे आहे की ह्यामध्ये आपणास काय आढळते. **शास्त्रांमध्ये तर आचार्यांनी आपल्या स्वतःच्या जीवनाचा अनुभव लिहिला आहे आणि त्यांचा अनुभव वाचणे आपणासाठी अशातऱ्हेने उपयोगी आहे की तो आपलादेखील अनुभव बनावा.** जेव्हा तो आपल्या जीवनाचा अनुभव बनेल तेव्हाच आपली परपदार्थांवरील पक्कड सुटेल. जीवनामध्ये परिवर्तन तर जे आपणास दिसते त्याने होईल आणि न की जे त्यांना दिसते त्याने होईल. जे त्यांना दिसून येते ते तर आपणाकरिता फक्त साक्षरुपाने राहू शकते.

७. **सातवी अज्ञानता – जेव्हा तत्त्वज्ञान खरे असत नाही तेव्हा अनंतानुबंधी कषाय होतात.** निमित्ताला कर्ता मानणेच अनंतानुबंधीचा जन्म आहे. जेव्हा आत्मस्वरुपाला जाणत नाही तेव्हा शरीरामध्ये आपलेपणा होतो. तेथें एका शरीरामध्येच आपलेपणा नाही परंतु अभिप्रायाच्या अपेक्षेने चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये आपलेपणा होतो. जर चौऱ्याऐंशी लाख योनींमधील कोणतीही योनी मिळाली असती तर त्याने त्यामध्ये आपलेपणा मानला असता अथवा सर्वच्या सर्व एकावेळेला मिळाल्या असत्या तर सर्वांमध्ये आपलेपणा झाला असता. अशाप्रकारे ह्याचा आपलेपणाचा विस्तार, अभिप्रायामध्ये अनंत पदार्थांमध्ये असतो. व्यक्तता जी समोर हजर आहे त्यामध्ये होत आहे.

अशाच तऱ्हेने जेव्हा निमित्ताला कर्ता मानतो तेव्हा अनंत जीव आहेत व अनंतानंत पुद्गल आहेत – हे सर्व आपल्या सुख-दुःखाचे निमित्त होऊ शकतात अर्थात सुख दुःखाचे कर्ता होऊ शकतात म्हणून त्या सर्वांप्रती राग-द्वेष करण्याचा अभिप्राय बनतो अर्थात अनंतानंत पदार्थांप्रती राग-द्वेषाचा अभिप्राय बनला म्हणून अनंतानुबंधी राग-द्वेष झाला. आपल्यापेक्षा भिन्न अनंतानंत पदार्थांना आपण निमित्त होऊ शकतो, म्हणून आपण त्या अनंतानंत पदार्थांचे भले-वाईट करु शकतो, म्हणून अभिप्रायामध्ये अनंत पटीने अभिमानाने हा ग्रस्त होत जातो.

हा निमित्ताचा कर्तापणा आपल्या स्वभावाला जाणण्याने आणि हे मानण्याने संपुष्टात येतो की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यास सुखी-दुःखी करु शकत नाही, राग-द्वेष करवू शकत नाही. प्रत्येक द्रव्य आपापले परिणमन करते. **एका द्रव्याची पर्याय अन्य द्रव्याच्या पर्यायीमध्ये निमित्तमात्र असते, परंतु कर्ता असू शकत नाही. अनंतानुबंधी कषायांचा संबंध तीव्र आणि मंद क्रोधादिकांशी नाही परंतु कषाय करण्याचा अभिप्राय असतो त्याच्याशी आहे. अन्यथा शुक्ललेश्याधारी द्रव्यलिंगीला अनंतानुबंधी चालू आहे आणि नरकातील सम्यग्दृष्टी नारकीला अनंतानुबंधी नाही - हे शक्य झाले नसते.**

अशाप्रकारे ह्या जीवाचे अज्ञान सर्व बाजूंना पसरलेले आहे आणि 'स्व' ला न ओळखता शरीर आणि परपदार्थांनाच हा आपल्यारुपाने पहात-जाणत आहे.

– पाच-लब्धी –

ज्याप्रमाणे आपण वर विचार करीत आलो आहोत की अज्ञानी जीवाला न तर आपल्या स्वरुपाची जाणीव आहे, न खऱ्या देव-शास्त्र-गुरुंच्या स्वरुपाची ओळख आहे आणि न की त्यांच्या पूजेच्या प्रयोजनाचा विचार आहे! **सर्वात प्रथम तर आपले प्रयोजन ठीक/बरोबर करण्यावर दृष्टी असली पाहिजे की मी आपल्या कषायांच्या कारणाने दुःखी आहे, ते कषाय आत्मदर्शनानेच नाहीसे होतील आणि ते आत्मदर्शन-खऱ्या देव-शास्त्र-गुरुंच्या माध्यमाने मला करावयाचे आहे.** हा खऱ्या देव-गुरु-शास्त्राचा शोध करुन पत्ता लावेल की मला कोठून तत्त्व मिळू शकते. त्याचा निर्णय करुन हा त्यांनादेखील आत्म्याला जाणण्याचे व ओळखण्याचेच माध्यम बनवेल.

खऱ्या देव-गुरु-शास्त्राचे निमित्तदेखील मोठ्या भाग्यानेच कदाचित एखाद्या जीवाला मिळते. ते मिळाल्यानंतर आत्मदर्शनाचा पुरुषार्थ करुन आत्म-अनुभव करणे फार मोठ्या साहसाचे काम आहे-तीव्र रुची हवी त्याकरीतां! परंतु प्रत्येक संज्ञी पंचेंद्रिय जीवाजवळ एवढा "क्षयोपशम" आहे, ज्ञानशक्तीचा एवढा उघाड आहे की तो स्वतःला जाणू-पाहू शकेल. **शक्तीचा उघाड तर तेवढाच आहे. आता इच्छेनुसार त्याला भोगांमध्ये लावावे किंवा स्वभावामध्ये लावावे - निवड करण्यामध्ये हा जीव स्वतंत्र आहे.** जर ह्याने ह्या शक्तीचा सदुपयोग न करता तिला भोगांमध्ये लावले तर ती घटत घटत अक्षराच्या अनंताव्या भागाएवढी फक्त उरेल आणि हा आपल्या चिरपरिचित ठिकाणी निगोदामध्ये पोहोचेल. ह्याविरुद्ध जर ह्या शक्तीचा योग्य उपयोग केला आणि स्वभावामध्ये लावले, तर ती शक्ती वाढत-वाढत

एक दिवस केवलज्ञानापर्यंत पोहोचेल. जसे, एखाद्याजवळ एक लाख रुपये आहेत, आता त्याने ते कसे वापरावेत हे त्याचे स्वातंत्र्य आहे. जर त्याने योग्य निवड करुन चांगल्या व्यापारामध्ये लावले तर ते लाख रुपये वाढून वाढून करोडो होतील, नाहीतर एक लाख देखील कमी होत होत नसल्यासारखे होतील.

जेव्हा जीवामध्ये शक्तीचा उपयोग करण्याची सद्‌बुद्धी जागृत होईल, कषायांची मंदता होईल, परिणामांमध्ये 'विशुद्धि' येईल, संसारामध्ये आकुलता भासित होईल, तेव्हा स्वला शोधण्याची जिज्ञासा ह्याच्यामध्ये उत्पन्न होईल की – "अनादिकाळापासून ह्या शरीराला आपला मानून/ समजून मी संसारामध्ये दुःखच दुःख प्राप्त करीत आलो. जन्मसमयी मी ह्याला आपल्याबरोबर आणले नव्हते आणि मरणसमयी देखील हे येथेच पडून राहील - माझ्याबरोबर येणार नाही. म्हणून असे वाटते की खरोखर मी ह्यारुपाने नाही. माझ्याहून एखादा वेगळाच हा जड पदार्थ आहे आणि मी तर चेतन जातीचा आहे. अहो! मी फार मोठी चूक केली की आजपर्यंत ह्याला आपले मानत आलो. ह्याला आपलेसे करुन मी काय काय पापं केली नाहीत? अभक्ष्य भक्षण केले, हिंसा-असत्य-चोरी-कुशील-अन्यायरुप आचरण केले. आता मी स्व-तत्त्वाला कसे जाणू? कोठे जाऊं?"

अशी पात्रता जेव्हा हा जीव निर्माण करतो, अशी तहान जेव्हा ह्याला उत्पन्न होते तेव्हा पावसाला यावेच लागते. असे म्हटले जाते की जेव्हा राजस्थानामध्ये धरणी अत्यंत तहानली जाते तेव्हा फाटते-तहानेमुळे व्याकुळ होऊन आपले तोंड खोलते - त्यावेळी पाऊस अवश्य पडतो. त्याप्रमाणे येथेदेखील असा पात्र जीव तयार होतो तेव्हा विपुलाचलावरुन वर्षा अवश्य होते. (विपुलाचल पर्वतावरुन समोवशरणामध्ये भगवान महावीरांची दिव्यध्वनी खिरली होती.) पात्रच वर्षेला हुडकत नाही, कधी कधी वर्षादेखील पात्राला हुडकते. भगवान सर्वज्ञ म्हणतात की तू आपल्या पात्राला सरळ कर, वर्षा येईल, जरुर येईल. जर पात्रच उलटे ठेवले तर वर्षा पडून देखील काय उपयोग? ती येऊन सुद्धा न येण्यातच जमा आहे. जर तुझे पात्र सरळ असेल (उपडे नसेल) तर 'देशने' ची प्राप्ती तुला अवश्य होईल. **अवश्यच एखाद्या कुंदकुंदांच्या दयेला प्रवाहित व्हावे लागेल. अशी संधी तू चुकवू नकोस. ही संधी घालवलीस तर अनंत संसारात भ्रमण करत रहावे लागेल.**

आता तरी स्वभावाला पहा, ज्ञानाच्या त्या अखंड पिंडाला पहा-जो वास्तविक तू आहेस. वर्तमानकाळामध्ये तुझ्यामध्ये एवढी शक्ती आहे की

गृहस्थावस्थेत रहात असून सुद्धा तू स्वतःला, त्या भगवान आत्म्याला पाहू शकतोस. – डोळ्यांनी नव्हे, इंद्रियांनींही नव्हे पंरतु स्वतःद्वारेच पाहू शकतोस. आपल्याला आपल्या रुपाने पाहण्यास गृहत्यागाची किंवा एखादे निर्जन शांत अरण्य असण्याची आवश्यकता नाही. आता ह्याचक्षणी, ह्याच परिस्थितीमध्ये, ह्याच क्षेत्रामध्ये तू त्या अप्रतिम आनंदाला प्राप्त होऊ शकतोस. त्या चैतन्याचा अनुभव करु शकतोस आणि वास्तविक हाच धर्म आहे.

धर्माबाबतीत अशी गोष्ट नाही की, आज धर्म करा आणि त्याचे फळ चार दिवसांनी मिळेल! धर्मरुप तुम्ही आत्ता व्हा आणि आत्ताच शांतीची प्राप्ती करुन घ्या. पहा, कोठे एक समयदेखील, एक क्षणदेखील व्यर्थ जाऊ नये. तो कोठे बाहेर नाही, तूच आहेस, म्हणून तू त्याला प्राप्त करु शकतोस. तो ह्या चर्मचक्षुंनी दिसणार नाही, त्याला पाहण्याकरिता तर तुला अंतंरगाचे चक्षु उघडावे लागतील. अंतरंगचक्षु खोलण्याने तुला ज्ञानरुपी समुद्र स्वतःच आव्हान करीत असलेला प्रतीत होईल की, ये माझ्यामध्ये मग्न होऊन जा, अनंतकाळापासून भीषण उन्हामध्ये संतप्त होऊन तू फिरत आहेस आणि मला तू प्राप्त केले नाहीस, आता मोठ्या प्रयत्नांनी मला प्राप्त केले आहेस, पहात काय बसलास दुरुनच, मार डुबकी, बुडून जा ह्या आनंदाच्या ज्ञान सागररुपी माझ्यामध्ये!

जसा एखादा स्वच्छ-निर्मल पाण्याने भरलेला तलाव असावा आणि अत्यंत उन्हामुळे व्याकुळ झालेला एखादा माणूस तेथे आला आणि त्याचा शीतलपणा, स्वच्छता व निर्मलपणा पाहून न कळत त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडले – अरे! हा तर जणु मला बोलावतच आहे की आपला दाह कमी करण्याकरिता स्नान कर.

त्याचप्रमाणे आचार्य कुंदकुंद म्हणत आहेत की ही अपूर्व-अमूल्य संधी व्यर्थ घालवू नकोस. एखाद्या पुण्याच्या फळामध्ये आसक्त होऊ नकोस. हा सर्वात मोठा धोका आहे जो धोका व्यक्ती स्वतःलाच देत असतो. त्याला तू अनंत-वेळा भोगले आहे. ज्ञानींनी, चक्रवर्तींनी ह्यांना पाप समजून सोडले आहे. मोठ्या मुश्किलीने ही संधी तुझ्या हाती आली आहे, 'कथमपि मृत्वा' – कोणत्याही प्रकारे, मरण आले तरी हरकत नाही, पण त्या तत्त्वाची प्राप्ती करून घे. पुढच्या जन्मावर सोडशील तर पुन्हा अनंत जन्म घ्यावे लागतील. ज्ञानीच्या श्रद्धेमध्ये एकदेखील भव असत नाही, असमर्थतेमुळे भले अनेक भव त्याला धारण करावे लागतील! तरी तो एक क्षणदेखील थांबू इच्छित नाही

अशाप्रकारे आचार्य कुंदकुंद किंवा आचार्य अमृतचंद्रा समान एखाद्या ज्ञानीची अशी दिव्य देशना ऐकून जर ह्याला हे समजले की, आजपर्यंत मी फार मोठी चूक केली होती की मी संसार-शरीर आणि भोगांसन्मुखच होतो आणि भगवान आत्म्याकडे पाठ फिरवली होती. आता परमात्मा बनण्याचा निर्णय करुन हा आपल्या तत्त्वासंबंधी रुचीमध्ये तीव्रता आणेल तर कषायांमध्ये मंदता होऊन 'प्रायोग्यलब्धि' होईल आणि पुन्हा ह्याचा आत्म्याच्या अनुभवाचा पुरुषार्थ जागृत होईल. येथवर चार लब्धि झाल्या. पाचवी 'करणलब्धि' तर तेव्हा होईल जेव्हा हा स्वतःला स्वतःमध्ये शोधेल आणि स्वानुभव होईल. स्वानुभवच सम्यग्दर्शन आहे, तेच सम्यग्ज्ञान आहे, तोच मोक्षाचा मार्ग आहे, तेच सर्व काही आहे.

जीवाचे ते सद्‌भाग्य कसे जागृत होईल? कसा ह्याला स्वानुभव होईल? ह्याचा मार्ग हाच आहे की, जर एखादा आत्मानुभवी गुरु सहज उपलब्ध असेल तर त्याच्या उपदेशाने संपूर्ण वस्तुतत्त्वाला जाणून (गुरु अनुभवीच असला पाहिजे कारण जो स्वतः त्या मार्गाने गेलेला नसेल तो इतरांना मार्ग काय दाखविणार?) आणि जर असा गुरु आढळत नसेल तर स्वतःच अध्यात्म ग्रंथांचा खूप अभ्यास करुन त्यातून आत्म्याच्या बाबतीत जाणून आपल्या अंतरंगात त्याने आत्म्याला पहावे. गुरुचे ह्याबाबतीत फार महत्त्व आहे कारण ते जीवंत शास्त्र आहे. कोठेही जराशी लहानशी देखील चूक किंवा अडथळा असेल तर ते हात पकडून पटकन थांबवतील. परंतु तरी देखील जर असा गुरु उपलब्ध नसेल तर भगवान कुंदकुंदांच्या वाणीचा तर ह्या जीवाला आधार आहेच.

आत्म्याच्या बाबतीत पूर्ण माहिती अध्यात्म ग्रंथातून ह्याला होईल आणि स्वानुभूतीची रीतदेखील माहित होईल. ती ह्याच्या बुद्धीमध्ये खूप चांगल्या तऱ्हेने ठसली जाईल की वस्तु-तत्त्व हेच आहे, अशाच प्रकारे आहे, दुसऱ्या प्रकारे नाही आणि दुसऱ्या प्रकारे होऊ देखील शकत नाही. मग त्यानंतर ह्याने आपल्या अंतरंगातच जेथे 'तो' आहे, त्या चैतन्याला पहाण्याचा पुरुषार्थ करावा.

तो देवांचा देव ह्याच्या आतच विराजमान आहे. कोठे बाहेर नाही. त्याला ह्याने आतच पाहिले—हुडकले तर त्याची प्राप्ती अवश्य होईल, कारण तेथे तो स्वतःच आहे. दोन गोष्टींचे ज्ञान तर ह्याला दिले जाऊ शकते. एक आत्म्याच्या बाबतीत ज्ञान आणि दुसरे अनुभवाच्या मार्गाचे ज्ञान. परंतु अनुभवाचा पुरुषार्थ तर ह्याला स्वतःलाच करावयाचा आहे.

आत्म्याच्या बाबतीतील जाणणे तर शास्त्राद्वारे होते अथवा शास्त्राच्या जाणकाराद्वारे होऊ शकते. परंतु आत्म्याला जाणणे स्वानुभूती द्वारेच होते. सम्यक्दर्शनाचा संबंध आत्म्याला जाणण्याशी आहे. **आत्म्याच्या बाबतीत जाणणे आणि आत्म्याला जाणणे ह्यात फार मोठा मौलिक फरक आहे.**

– आत्म्याच्या बाबतीत माहिती –

जगामध्ये मुख्य द्रव्यं दोन आहेत – जीव आणि पुद्‌गल. जीव अनंत आहेत, पुद्‌गल अनंतानंत आहेत. अनादिकाळापासून जीवाबरोबरच द्रव्यकर्माचा संयोग आढळतो आणि त्या द्रव्यकर्माच्या उदयाने आत्म्याबरोबर शरीराचा आणि तत्संबंधी अन्य चेतन व अचेतन पदार्थांचा संबंध होतो.

हा जीव स्वतःला एक अमूर्तिक चैतन्य तत्त्व न ओळखता स्वतःला शरीर आणि परपदार्थरुप मानतो. त्यामुळे ह्याच्यामध्ये अनेक प्रकारच्या इच्छांचा जन्म होतो. आत्मा तर एक त्रैकालिक नित्य आणि ध्रुव द्रव्य आहे, परंतु शरीराबरोबर रोग, जन्म, वृद्धत्व, मरण, तहान-भूक, थंडी, उष्णता वगैरे अनेक समस्या आहेत आणि त्या तहान-भूक वगैरेंच्या शमनाकरिता हा जीव अनेक इच्छा करतो. त्या इच्छांच्या पूर्तीमध्ये जे कोणीही सहाय्यक असतात त्यांच्याबद्दल राग आणि जे काही प्रतिकूल होतात त्यांच्याबद्दल द्वेष करतो. म्हणून राग-द्वेष वगैरे अनेक विकारी भाव आत्म्यामध्ये दिसून येतात.

अशाप्रकारे अनादिकाळापासूनच जीवाबरोबर द्रव्यकर्माचा आणि त्या द्रव्यकर्माच्या उदयामुळे राग-द्वेष वगैरे भावकर्म व शरीरादी नोकर्माचा आणि शरीराशी संबंधित इतर चेतन व अचेतन पदार्थांचा संयोग आढळतो. बाह्यामध्ये चेतन-अचेतन पदार्थांचा संयोग जीवाच्या आपल्या पुण्य-पापाच्या उदयानुसार शुभ व अशुभ असतो. शरीराची क्रिया देखील शुभ व अशुभ होत असते आणि अंतरंग भाव देखील शुभ व अशुभ दोन प्रकारचे होत असतात. हे सारे काम द्रव्यकर्माच्या उदयाचे आहे, ही सर्व कर्मधारा आहे, ह्यामध्ये चेतनेचे आपले काहीही नाही.

चेतनतत्त्व ज्ञान, दर्शन, सुख, वीर्य वगैरे अनंत गुणांचा पिंड आहे. ज्ञानगुण ह्यांच्यामध्ये मुख्य आहे कारण ज्ञान स्व-परप्रकाशक आहे. म्हणून चेतन फक्त ज्ञाता आहे आणि त्याचे काम जाणणे-पाहणे आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये ही ज्ञानधारा चालू आहे. परंतु 'ज्ञान' स्वतःला ओळखत नाही, कुठल्याशा निद्रेमध्ये मूर्च्छित आहे आणि पागल (वेडा) होऊन कर्मधारेमध्ये आपलेपणा मानत आहे. **परंतु कर्मधारेमध्ये अर्थात शुभ, अशुभ वगैरे विभाव भावांमध्ये आणि शरीरामध्ये आपलेपणा मानत असूनसुद्धा ज्ञानरुप चैतन्य कधीही राग-द्वेष अथवा शरीररुप होत नाही, सदैव चैतन्यच असते.**

ज्याप्रमाणे, तुपाबरोबर माती मिसळली आहे आणि आपण त्याला तापविले. माती मिसळलेली असूनसुद्धा तूप तर तूपच आहे. माती वेगळे द्रव्य आहे आणि तूप वेगळे द्रव्य आहे. गरम होत असताना देखील ते तूप आपल्या स्वभावामध्ये म्हणजेच स्निग्धपणामध्येच विद्यमान आहे. गरमपणाच्या अभावामध्ये देखील स्निग्धपणाची अर्थात तुपाची उपलब्धी असते. परंतु स्निग्धपणाच्या अभावामध्ये तुपाची उपलब्धी असत नाही. म्हणून स्निग्धपणाच तुपाचे सर्वस्व आहे. तुपामध्ये गरमपणा स्वतः आला नाही परंतु अग्निजन्य आहे. येथे सिद्धांतामध्ये मातीच्या जागी शरीर आणि स्निग्धपणाच्या जागी चैतन्य आणि गरमपणाच्या जागी भावकर्म आणि अग्निच्या जागी द्रव्यकर्म आहेत. माती आणि तुपाच्या मिश्रणाप्रमाणे शरीर व चैतन्य मिसळून एकच आहेत असा भास होतो आहे. परंतु ती वेगवेगळी द्रव्यं आहेत आणि गरम तुपाप्रमाणे चैतन्यदेखील राग-द्वेष वगैरे भावकर्मांनी तप्तायमान होत आहे. परंतु हे सारे विकारी भाव आहेत, चेतनेचे आपले नाहीत, द्रव्यकर्मजन्य आहेत, द्रव्यकर्माच्या उदयाने आत्म्यामध्ये झाले आहेत, म्हणून परच आहेत.

तेथे दोन्ही वस्तु आहेत – ज्ञानदेखील आहे आणि कर्मदेखील आहे आणि पाहणारा हा स्वतः आहे. ह्याला स्वतःलाच निवड करावयाची आहे की मी स्वतःला ज्ञानरुप पाहू की कर्म आणि त्याच्या कर्मफलरुप पाहू! **स्वतःला पररुप पाहणे तर संसार आहे. पाहणे म्हणजे वाचणे नाही, ऐकणे नाही, म्हणणे नाही तर फक्त पाहणे. बळ पाहण्यावर आहे आणि 'स्व'ला 'स्व'रुप पहाणे तर मोक्ष आहे. आपल्याला निजरुप पाहणेच मोक्षरुप आहे, मोक्षाचा मार्ग आहे, सम्यग्दर्शन आहे, स्वानुभूती आहे. परापासून हटणे - आपल्यामध्ये स्थिर होणे आहे, आपल्यामध्ये स्थिर होणे - परापासून हटणे आहे. ह्यामध्ये बळ आपल्यामध्ये स्थिर होण्यावर आहे. परमार्थ आपल्यामध्ये स्थिर होणे हा आहे. आपल्यामध्ये स्थिर होणे हा धर्म आहे, परापासून हटणे तर केवळ व्यवहार आहे.**

जोपर्यंत ज्ञान मूर्च्छित अवस्थेमध्ये आहे – मूर्च्छित अवस्थेचा अर्थ असा आहे की ज्याप्रमाणे मतवाला (नशा करणारा) स्वतःला अथवा अपल्या घराला जाणत नाही आणि एखाद्या परामध्ये आपलेपणा मानतो, तसेच हा देखील एखाद्या परामध्ये, शरीरामध्ये, पुण्य-पापाच्या उदयामध्ये किंवा शुभ-अशुभ भावामध्ये आपलेपणा-अहंपणा-मानतो की, हा मी - हे माझे आणि मी ह्यांचा कर्ता आहे. **अशुभ क्रियेला आणि अशुभभावाला, शुभक्रियेमध्ये व शुभभावामध्ये पलटण्यामध्येच हा आपला पुरुषार्थ समजतो**

आणि ह्यालाच मोक्षमार्ग मानतो. कधी ज्ञानामध्ये जागृत होण्याचा पुरुषार्थ ह्याने केलाच नाही. ज्ञान जागृत होण्याचा संबंध न तर शुभ-अशुभ भावांशी आहे आणि न शुभ-अशुभ क्रियांशी आहे आणि न क्षायोपशमिक ज्ञानाशी अर्थात पर्यायीमध्ये ज्ञानशक्तीचा उघाड वाढविण्याशी आहे.

म्हणून सम्यग्दर्शनाकरिता शुभभावांचा, शुभ क्रियांचा व क्षायोपशमिक ज्ञान वाढविण्याचा पुरुषार्थ कार्यकारी नाही. ज्ञानाला जागृत करण्याकरिता तर ह्याला अंतरंगातील जाणणाऱ्याला पकडावे लागेल. शुभ-अशुभ भावांमध्ये व क्रियांमध्ये आपलेपणा न करता, त्या जाणणाऱ्यामध्ये आपलेपणा, स्वामित्वपणा, कर्तापणा, एकत्वपणा झाला तर शुभ-अशुभ भाव करण्याचा मिथ्या अहंकार नष्ट होईल आणि सम्यग्दर्शनाची प्राप्ती होईल.

प्रत्येक व्यक्तीच्या प्रत्येक समयाला तीन क्रिया होत असतात. शरीराची शुभ किंवा अशुभ क्रिया, परिणामांची शुभ किंवा अशुभ क्रिया, आणि ज्ञानाची जाणणेरुप क्रिया. जाणण्याची क्रिया ह्याच्या पकडीत येत नाही आणि शरीर व परिणामांच्या क्रिया पकडीत येत आहेत, म्हणूनच हा जीव स्वतःला शरीर किंवा परिणामरुपच समजतो. परंतु जाणण्याची क्रिया तर प्रत्येक समयाला होत आहे. शरीराची कोणतीही अवस्था असो तिला जाणणे चालूच आहे. म्हणून तर हा म्हणू शकतो की काही वेळा पूर्वी मी असा बसलो होतो. ज्या समयी त्या अवस्थेमध्ये शरीराची बसण्याची क्रिया होत होती त्याच समयी तो जाणणारा त्या अवस्थेला जाणत होता.

शरीराच्या क्रियेमध्ये व जाणण्याच्या क्रियेमध्ये कोणताही समयभेद नाही. अशातऱ्हेने परिणामांचीसुद्धा कोणतीही अवस्था असो त्यांचे जाणणेदेखील त्याच समयी बरोबर होतच आहे. कोणीतरी आहे तेथे, जो सतत जाणत आहे की आता क्रोधरुप परिणाम होते आणि आता क्रोधरुप परिणाम नाहीत. विचारले असता हा असे सांगतो देखील. ह्याचा अर्थ असा आहे की, त्या सर्वांना आणणारा एखादा तेथे जरुर असला पाहिजे. क्रोधाच्या सद्भावामध्ये त्या जाणणाऱ्याने क्रोधाला जाणले आणि तो क्रोध निघून गेल्यावर आता तो त्या क्रोधाच्या अभावालादेखील जाणतो आहे. तो जाणणारा सतत एकरुपाने, जे काही परिणमन होत आहे, त्या सर्वांना जाणत आहे, जाणतच चालला आहे. त्याचे केवळ जाणण्याचेच काम आहे.

कर्माचें फळ बदलत आहे परंतु तो जाणत आहे, जाणणारा बदलत नाही. तो जन्माला देखील जाणत आहे मृत्यूलाही जाणत आहे परंतु तो स्वतः न मरतो, न जन्मतो. ही अवस्था, हा जाणणेपणा सर्वांमध्ये आहे परंतु जाणणारा स्वतःला पहात नाही. **आपले विकारी परिणमन, शरीराची**

क्रिया आणि शरीरा बरोबरील संयोग-हे सर्व त्याच्या ज्ञानाचे ज्ञेय आहेत आणि तो ह्यांचा ज्ञाता आहे. ज्ञात्याचे कार्य होत आहे, नाहीतर ह्या सर्वांना कोण जाणू शकत होते? तेथे दोघेजण आहेत, ज्ञान आणि कर्म, दोघेही बरोबरीने चालत आहेत. प्रत्येक समयी, झोपताना-जागेपणी-एक तो आहे जो झोपत आहे एक त्याला जाणणारा आहे. एक तो आहे जो खात आहे, चालत आहे, पहात आहे, रडत आहे, आणि एक तो आहे, खात असूनही खात नाही, चालत असूनही चालत नाही, रडत असूनही रडत नाही, क्रोधादी होत असूनही क्रोधी होत नाही, दुःख असूनही दुःखी होत नाही, सुख असूनही सुखी होत नाही, परंतु तो सर्व अवस्थांना फक्त जाणत आहे.

आता ह्या दोहोंमधून **जीवाला हा निर्णय करावयाचा आहे की, मी कोण आहे? आत्मा नित्य आहे, म्हणून मी जाणणाराच असू शकतो, आणि हे सारे परिणमन अनित्य आहे, निरंतर बदलत जात आहे, म्हणून मी त्यारुपाने नाही.** जर मी ह्यारुपाने असतो तर ह्याच्या नाशाबरोबर माझाही नाश व्हायला पाहिजे होता. परंतु माझी सत्ता ह्यांचा नाश होऊन देखील कायम आहे, म्हणून ह्यांच्यारुपाने मी कसा असू शकतो?

अशातऱ्हेने प्रथम तर बुद्धीच्या पातळीवर - विकल्परुपाने निश्चित करावे की मी तर केवळ जाणणारा आहे आणि बाकी सर्व पर आहे. अशा निर्णयानंतर आता त्या जाणणाऱ्यामध्ये, जेथे की तो आहे, आपल्या आत-आपल्या सत्तेची-अनुभूती करावयाची आहे.

– स्वानुभवाच्या मार्गाने ज्ञान –

प्रश्न असा आहे की, **अशी अनुभूती कशी होईल?** मोठे कठीण होऊन जाते अशावेळेला की, **जे काही निःशब्द जाणले गेले आहे, त्याला शब्दांमध्ये कसे सांगावे?** जे स्वतः निर्विकल्परुप आहे त्याला विकल्पामध्ये कसे सांगावे? परंतु तरी देखील त्याच्या प्राप्तीचा उपाय सांगण्याचे थोडे साहस तर केले जाऊ शकते. आपल्यामध्ये मनाच्या, विचारांच्या, श्वासाच्या, वाचेच्या आणि कायेच्या ज्या काही क्रिया दरसमयाला होत आहेत, चेतना त्यांची साक्षीभूत बनून त्यांना निरंतर पहात आहे. परंतु त्या विचार वगैरेंना आम्ही आपले -असणे - समजले आहे, आणि त्या 'साक्षी'ला आपण ओळखत नाही. परंतु खरे तर, आत्म-अनुभवाकरिता त्या 'साक्षी' चा अभ्यासच अपेक्षित आहे. साक्षीभावाचा अर्थ आहे दर्शन अर्थात न विचार करता पाहणे. 'साक्षी आहे निर्विचार दशा' जेथे फक्त पाहणे आहे. म्हणून आपल्या विचारांचा किंवा श्वासाचा किंवा मंत्राचे किंवा पूजेचे उच्चारण

करीत असताना त्यांचा साक्षी बनून आपण आपल्या चैतन्यामध्ये आपल्या सत्तेची अनुभूती करु शकतो.

मन साक्षी

आपली जी काही आत्मशक्ती आहे तिचा एक छोटा अंश तर शरीराच्या क्रियेमध्ये खर्च होत आहे. परंतु तिचा अधिकांश, मनाद्वारे विचार करण्यामध्ये जात आहे. जी काही शक्ती वाचा किंवा मनामध्ये जात आहे तिलाच आवरुन ज्ञात्यामध्ये, त्या जाणणाऱ्यामध्ये लावावयाची आहे.

ह्याचा एक उपाय हा आहे की, मनामध्ये जे काही भाव (विचार) चालू आहेत, आपण त्याला पाहण्यास चालू करावे. **शक्ती तर ती एकच आहे. म्हणून जोपर्यंत मनाचे विचार किंवा विकल्प चालू आहेत तोपर्यंत ज्ञातापणा नाही आणि जेव्हा तीच शक्ती ज्ञात्यामध्ये लावली जाईल तेव्हा विचारांना बंद पडावेच लागेल.** हे विचारच दिवसाची स्वप्नं आहेत, ही डोळे उघडे असताना चालू असतात आणि रात्रीची स्वप्नं डोळे बंद केल्यानंतर चालू होतात, दोघांमध्ये काही फरक नाही. ह्या विचारांना काही अर्थ नाही, निरर्थक आहेत. स्वप्नांना, जसे जाग आल्यानंतर व्यर्थ समजले जाते, तसे हे विचार व्यर्थ आहेत. परंतु हे होत असल्याने ह्यांची आपणास किंमत मोजावीच लागते. विचार येतो आणि निघून जातो, परंतु चेतनेवर संस्काररुपाने आपली छाप सोडून जातो. ते संस्कार भविष्यकाळात पुन्हा उभे राहतात आणि चेतना पुन्हा त्यारुपाने परिणमन करते.

म्हणून मन जोपर्यंत आहे, तोपर्यंत दुःख आहे, मन जोपर्यंत आहे तोपर्यंत नरक आहे. आता मनाचा आश्रय सोडा, मनाच्या खिडकीपासून बाजूला व्हा, हाच ध्यानाचा अर्थ आहे. मनापासून दूर होताच निर्विकार झाला आहे समजा. ध्यानामध्ये बसा आणि विचारांना पहात जा, पहात जा, भले शुभ विचार असो किंवा अशुभ-त्याला कोणताही विरोध करु नका असा विचार का आला? आणि असा का नाही आला? तुमचे काम आहे फक्त जाणणे, त्या जाणणेपणावर जोर देत जा. तुम्ही त्या विचारांना न तर करणारे आहात आणि न तर अडविणारे आहात! तुम्ही तर फक्त त्यांना जाणणारेच आहात. आपले काम करत रहा.

तुम्ही मन नाही, तुम्ही देह नाही, जरा आता सरका आणि पहात रहा. मनाला बजावून सांगा – "जेथे जायचे असेल, जो विचार करावयाचा असेल, कर; आम्ही तर चुपचाप बघत राहू." असे म्हणून जेव्हा पाहणे चालू केले की तुम्हाला आढळून येईल की मन पुढे सरकतच नाही - तुम्ही

करुन पहा. आजच करून पहा. हे मन तेव्हा शेवटचा विकल्प करेल की, 'सोड ना, कोणत्या भानगडीत पडला आहेस तू? अगोदरच चांगले होते, ह्या सर्व गोष्टी खोट्या आहेत.' **परंतु तुम्हाला ह्या मनातून बाहेर पडायचे आहे. जर तुम्ही धैर्य बाळगले आणि पहातच राहिला, तर तुम्हाला आढळेल की कधी कधी काही होऊ लागते जणु रिमझिम पावसाची सर येऊन गेली.** एक क्षणापुरते सर्व काही शून्य होऊन जाते, निर्विकार होते. जर असे झाले तर हाती चावी सापडली की निर्विकार होणे शक्य आहे. आणि जो एका क्षणाकरिता होऊ शकतो तो एक मिनिटाकरिता, एक तासाकरिता, एक दिवसाकरिता आणि नेहमीसाठी का नाही? सुरुवातीला थेंब थेंब पडतील, नंतर एक दिवस वादळ येईल, पूर येईल. तेव्हा काय होईल? तेच होईल जे आजतागायत कधी झाले नव्हते. लक्षात येईल की आतमध्ये कोणी जागा झाला आहे. बाहेरुन झोपलेला असला तरीदेखील तो जागा झालेला आहे हे लक्षात येईल, चालत असुनसुद्धा चालत नाही असे भासेल, बोलत असूनही मौन दिसून येईल. बाह्यामध्ये सर्व क्रिया होतील परंतु 'त्याच्यामध्ये' काहीही होत असलेले जाणवणार नाही. ज्याच्या उपस्थितीमध्ये तुम्ही शांत होऊ लागाल, जो विचारांपासून वारंवार हटवून तुम्हाला अंतरंगात पोहचवू लागेल तोच साक्षीभाव आहे.

साक्षीची अनुपस्थितीच मन आहे. जेव्हा साक्षी झोपतो तेव्हा मन आपले काम करते. ज्या वेळेला, तुम्ही जागे व्हाल, सावध व्हाल, साक्षी बनाल, त्यावेळेला लक्षात येईल की मन गायब झाले. तुमचा संसार तुमच्या मनामध्ये आहे. साक्षी होताच मन नाहीसे होते. नष्ट कोणाला करणार? जेव्हा तुम्ही असता तेव्हा ते असत नाही आणि जेव्हा ते आहे तेव्हा तुम्ही नाही. जोपर्यंत मनाच्या विचारांमध्ये तुम्हाला रस (आनंद) येत आहे, त्यांच्या दिशेला तुम्ही तोंड केलेले आहे, तोपर्यंतच त्यांना बळ प्राप्त होत आहे. तुम्ही मनाकडे पाठ फिरविताच तुम्ही त्या साक्षीच्या-आत्म्याच्या-सन्मुख व्हाल. **सर्व विकार-विकल्प गायब होतील. सर्व शून्य होईल आणि फक्त एक जाणणाराच उरेल - तेव्हा स्वतःचे दर्शन होईल.**

मंत्र व श्वास साक्षी ------- णमोकार मंत्राचा उच्चार करा व आपल्याच कानांनी ऐका. जर मन कोठे भरकटत गेले तर लगेच ऐकणे बंद होईल. वारंवार ऐकण्याचा प्रयत्न करा. जर काही काळ ऐकणे चालू राहिले तर बोलणे बंद होईल, उपयोगामध्ये स्थिरता येऊ लागेल. विचार जे आत चालत होते ते बंद होतील. फक्त मंत्र बोलणे आणि ऐकणे चालू राहील. चेतनेची शक्ती ऐकण्यामध्ये लागेल तर बोलण्यामध्ये कमी होऊ लागेल.

बोलणे सूक्ष्मापासून सूक्ष्मतर होऊन जीभ हलणे देखील बंद होईल. परंतु मंत्राचे उच्चारण अंतरंगात चालूच राहील आणि ऐकणे सुद्धा अंतरंगात चालू राहील. ह्यापेक्षाही पुढे जाल तर मंत्र उच्चारण थांबेल आणि श्वासाचे येणे जाणे, जे आतापर्यंत कधी अनुभवास आले नव्हते, लक्षात येऊ लागेल. परंतु तुम्ही श्वास घेणारे बनू नका-श्वासाला जाणणारेच रहा. अनेक दिवस हा सराव/अभ्यास चालू ठेवावा लागेल.

निरंतर अभ्यास करत रहाल तर शांती मिळू लागेल. परमात्म्याच्या आनंदाची झुळूक येऊ लागेल – समुद्र अजून दिसला नाही परंतु सागरावरुन येणारी थंड हवा जाणवू लागेल रस येऊ लागेल. परंतु थांबू नका, काही होणार आहे, पाण्याने भरलेले मेघ दाटले आहेत, बस आता थोडाच वेळ बाकी आहे.

बाहेरील गोष्टींपासून हटलो आहोत, इंद्रियांच्या विषयांपासून हटलो आहोत, इंद्रियांपासून हटलो आहोत मनापासून हटलो आहोत, आता श्वासावर येऊन थांबलो आहोत. ज्ञात्यावर जरा बल दिले की श्वासापासूनही हटलो आणि तेव्हा फक्त एक मात्र तो चैतन्य - अनुभवास येतो.

पूजा व स्तुती–साक्षी–पूजा करा आणि ऐकण्याचा प्रयत्न करा. स्तुती म्हणत असताना ऐकण्याचा प्रयत्न करा. ऐकण्याचा प्रयत्न करताच मनाचा व्यापार थांबेल. जी शक्ती मनाद्वारे व्यर्थ गोष्टींचा विचार करण्यामध्ये जात होती, ती शक्ती आता ऐकण्यामध्ये लागेल. बाहेर पूजा व स्तुती चालू आहे आणि अंतरंगात त्यांना जाणणे चालू आहे, चालूच रहात आहे. ह्या दोन्ही क्रियांमध्ये मनाचे कोणतेही विचार-विकल्प असत नाहीत. म्हणून शांतीचा अनुभव होतो. **जाणण्यावर जर विशेष जोर देत गेलात तर पूजा व स्तुती बोलण्याचे मंद होत-होत एक काळ असा येईल की म्हणणे बंद होईल आणि तेव्हा फक्त एक मात्र चैतन्य तुमच्या अनुभवामध्ये येईल.** तेथे शरीर नाही, कर्म नाही, कोणता शब्द नाही, कोणता विकल्प नाही, राग-द्वेषादी नाही, कोणी "मी" नाही, फक्त एक एकटा "तो" चैतन्य आपल्या वेगळ्या महिमेसह विराजित आहे.

अशात-हेने कोणत्याही धार्मिक क्रियेला माध्यम बनवून, तिचा साक्षी बनत-बनत जेव्हा जीवाची अनुभूती जागृत होते, तेव्हा ह्याला पत्ता लागतो की अरे! मी तर हा जाणणाराच होतो. आजपर्यंत मी कसा कोणत्या धुंदीत होतो, खुळा बनत होतो की मी सर्वांना जाणले, परंतु जो जाणणारा आहे, त्यालाच जाणले नाही – स्वतःलाच जाणले नाही. हा तर प्रत्यक्ष आहे परंतु मी बघत नसल्यानेच तो झाकला गेला होता. **ज्याप्रमाणे एखादा स्वप्नातून**

जागा होऊन (स्वप्नातील) दुःखांना गमावून बसतो त्याप्रमाणेच जेव्हा हा जागृत होतो तेव्हा ह्याचे अनादिकालीन दारिद्य समाप्त होते.

साक्षीभावच एक असा उपाय आहे की ज्याच्यामुळे कषाय नाहीसे होतात, इंद्रियांचा आधीनपणा समाप्त होतो, जे आपले आहे ते रहाते आणि जे आपले नाही ते जाऊ लागते. त्या अनुभवाने जो आनंद प्राप्त होतो ती सांगण्यासारखी गोष्ट नाही, ती तर 'मुक्याला गुळाप्रमाणे' आहे. मुक्या व्यक्तीला गुळाची चव तर प्रत्यक्षच येते परंतु ती जिव्हेने सांगू शकत नाही. **असा अनुभव ह्या क्षेत्रामध्ये, ह्या काळामध्ये, बालक-तरुण-वृद्ध, स्त्री-पुरुष-सर्वांना-घरी रहात असताना देखील होऊ शकतो. ते तर ठीक परंतु पशुला देखील होऊ शकतो आणि ह्या अनुभवानंतर तो पशुदेखील ज्ञानी म्हटला जातो, मोक्षमार्गी होतो.**

'अनुभवा' करिता पुरुषार्थ व धैर्याची अधिकात अधिक आवश्यकता आहे. जर तो धैर्यासहित प्रयत्न करीतच गेला तर अनुभूतीला व्हावेच लागेल. कारण ती स्वाधीन गोष्ट आहे. बाकी सर्व वस्तुंना प्राप्त करण्याकरिता तर कर्माचा सहभाव अपेक्षित आहे, परंतु ह्यामध्ये अभाव पाहिजे. **जीवाचा पुरुषार्थ तर ज्ञात्यावर जोर देणे एवढाच आहे.** जाणणेपणामध्ये आपले सर्वस्व स्थापित करणे एवढाच आहे, अनुभूती झाली की नाही, ह्यावर दृष्टी असता कामा नये.

हे मन तर खूप चलाख आहे, ज्ञातापणापासून डगमगविण्याकरिता हा विकल्प उभे करतो की तुम्हाला स्वानुभूती करावयाची होती, पहा तर खरोखरच झाली की नाही? का होत नाही बरे? काय कारण आहे? हे मन प्रलोभन देण्यामध्ये सुद्धा फार पक्के आहे. तुम्ही त्याचे ऐकू नका. त्याचे ऐकू लागलात तर विकल्पांमध्येच थांबाल आणि अनुभूती होण्याचे तर दूर राहो, ज्ञातापणापासून देखील वंचित रहाल. **तुम्ही तर जाणणाऱ्यावरच जोर देण्याच्या पुरुषार्थामध्ये संलग्न रहा. एक दिवस स्वानुभव तर आपोआपच, विनासायास होईल. तुम्ही कधी विचारदेखील केला नसेल, कल्पनादेखील केली नसेल की असे देखील कधी होऊ शकते.**

– स्वानुभव –

मिसळलेल्या-एकत्रित असलेल्या-वस्तुंमध्ये आपले अस्तित्व आपल्या-मध्येच अनुभव करणे स्वानुभव अथवा निजसत्तावलोकन आहे. आत्मानुभव करणाऱ्या साधकाने सर्वप्रथम तर आत्म्याचे द्रव्यार्थिक तसेच पर्यायार्थिक दोन्ही दृष्टींनी जसे स्वरुप आहे तसा आगमाच्या माध्यमातून निर्णय

करावा. नंतर ज्ञानस्वभावरुप त्या आत्म्याचा अनुभव करण्याकरिता, परसंयोगांना आपल्या ज्ञानामधून बाद करावे आणि त्यांनी होणाऱ्या भावांना त्यांच्या त्यांच्या (पर संयोगाच्याच) खात्यामध्ये जमा करावे. **द्रव्यकर्म, नोकर्म व भावकर्मांना बाद केल्यानंतर जे बाकी राहिलेले केवळ चित्चमत्कारमात्र आपले स्वरुप, त्याचा विचार करावा.** तेथे अनेक प्रकारांनी निजस्वरुपामध्ये, निज चैतन्यसत्तेमध्ये अहंबुद्धी धारण करावी की मी शुद्ध आहे, चिदानंद आहे, ज्ञानस्वरुप आहे वगैरे.

असा विचार झाल्याने आपोआप आनंद-तरंग उठतील, रोमांचित व्हाल-परंतु अजूनपर्यंत सुद्धा विचार किंवा विकल्पच आहे. निज अनंतगुणांना आत्मद्रव्यामध्ये अभेद करावे आणि पंचेंद्रियांद्वारे तसेच मनाद्वारे जो ज्ञानोपयोग बाह्य पदार्थांमध्ये जात होता, त्याला त्या अभेद-अखंड ज्ञानपिंड-सत्तात्मक आत्मद्रव्याच्या सन्मुख करावे. श्रुतज्ञानालादेखील नयपक्षांच्या अवलंबनापासून हटवून त्याच आपल्या निजसत्तेसन्मुख करावे. **तेव्हा आपल्या मति-श्रुतज्ञानाच्या पर्यायीमध्ये अन्य ज्ञेय न होता आपला निजात्म स्वभावच ज्ञेयपणाला प्राप्त होऊन, विज्ञानघन परमात्मा निजरुप - आपल्यामध्ये प्रत्यक्ष अनुभवामध्ये येतो.**

खालच्या भूमिकेमध्ये-चौथ्या व पाचव्या गुणस्थानांमध्ये - स्थित असलेल्या साधकांना तर स्वानुभवामध्ये स्वभावाचा स्पर्शमात्रच होऊ शकतो. परंतु स्पर्श होताच जी गोष्ट घडते ती आपल्या पकडीत येते - सर्व जगत नाहीसे होते, शरीर विसरले जाते, मन विसरले जाते परंतु तरीदेखील चैतन्यदीपक अंतरंगात जळत राहतो. शरीर आपल्याला समोर पडलेले वेगळे दिसून येते. अभ्यासू साधकाला कधी कधी असा अनुभव आपल्या प्रयत्नाशिवायही घडून येतो. अचानक आपण शरीराहून अलग/वेगळे होतो, शरीर वेगळे जाणवू लागते. **न एखादा विकल्प राहतो न एखादी चिंता! असे वाटते की आता ही चेतना शरीराहून वेगळीच राहील. अशी घटना समाप्त झाल्यावर देखील दिवसभर त्याचा असर/परिणाम कायम राहतो.**

अशी विरक्ती होते की जशी पूर्वी कधीच झाली नव्हती. **त्यानंतर शरीराचा जन्म ह्याचा जन्म असत नाही आणि न शरीराचा मृत्यू ह्याचा मृत्यू असतो. मृत्यूचे भय समाप्त होते. ह्याने मृत्यूला जणु प्रत्यक्ष पाहिले आहे - जे मृत्यूमध्ये घडते ते आज साक्षात झाले आहे. ही दशा जास्त काळ रहात नाही.** जर लवकर लवकर अनुभव झाला तर विरक्ती टिकते, परंतु जर खूप दिवसांपर्यंत झाला नाही तर जुन्या आठवणीप्रमाणेच उरतो.

– ज्ञानीची दशा –

ज्ञानीला स्वभावाच्या आनंदाचा अनुभव झाला आहे. स्वरुपाच्या आनंद सागरामध्ये बुडी मारुन, डुबकी मारुन तो वारंवार शीतलपणाचा अनुभव करतो आणि जेव्हा त्या सागराच्या पृष्ठभागावर येऊन संसारावर ह्याची दृष्टी पडते तेव्हा सारे जग ह्याला झोपले आहे असे वाटते, जणु ते एखाद्या गाढ निद्रेमध्ये लीन झाले आहे. **बाह्यामध्ये सर्व काही ह्याला असे भासते की जसे दिवसा पहात असलेले स्वप्न असावे.** रात्री आपण स्वप्न पाहतो - सकाळी उठताच हे जाणविते की ते सर्व काही खोटे होते. गंमत अशी आहे की, ज्या वेळी तो स्वप्न बघत होता, त्यावेळेस तर ते सत्यच भासत होते. परंतु जेव्हा झोप उडाली, जाग आली, तेव्हा लक्षात आले की ते तर स्वप्न होते. स्वप्नाला स्वप्न जाणले, बस गोष्ट संपली, ह्याच्या पुढे कोणत्या खुलाशाची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे **त्या सम्यग्दृष्टी ज्ञानीची देखील मोहनिद्रा ज्यामध्ये तो चिरकाळापासून झोपलेला होता, समाप्त झाली. ज्यावेळी तो झोपेत होता, त्यावेळी तर तो संसार त्याला योग्यच वाटत होता, परंतु जाग येताच तो स्वप्नवत भासू लागला.**

सात तत्त्व

अज्ञानदशेमध्ये जेव्हा हा स्वतःला कर्म आणि त्याचे फलरुप, शरीररुप पहात होता अर्थात तो जीव स्वतःला अजीवरुप पहात होता तेव्हा आत्मिक शक्ती कर्मामध्ये लागण्याने आस्रव व बंध होत होता आणि अशातऱ्हेने कर्मच वाढत होती. **आता ह्याने स्वतःला ज्ञानरुप, निजरुप पाहण्याचा प्रारंभ केला तेव्हा भविष्यामध्ये जी कर्म आली असती त्यांचे तर येणे थांबले अर्थात संवर झाला, आणि अगोदर बांधलेल्या कर्मांची निर्जरा सुरु झाली. आता हा उपयोगाला अंतरंगामध्ये जोडून शांत रसामध्ये वारंवार स्थिर होतो.** परंतु तेथे आपल्या स्वभावामध्ये जास्त वेळ थांबू शकत नाही.

ह्याचा दर्शनमोह तर निघून गेला परंतु चारित्र मोहाचा सद्‌भाव अजून आहे. पराच्या मालकीपणाचा स्वामीत्वपणाचा राग तर ह्याला राहिलाच नाही, परंतु असमर्थतेचा राग अजून बाकी आहे, म्हणून हा राग ह्याला अंतरंगातून बाहेर खेचून आणतो. येथे जुन्या साठलेल्या कर्मांचा उदयदेखील येतो, जी कर्मे अनंतानंत जन्मांपासून एकत्र केली आहेत. परंतु आता हा त्यांना जाणणारा राहतो. कर्माच्या फलरुप असत नाही. **आता कर्मामध्ये ह्याचा आपलेपणा, कर्तापणा, अहंपणा उरला नाही. ह्याचा अहंपणा तर आपल्यामध्ये, चैतन्यामध्ये, ज्ञाता-दृष्टापणामध्ये झाला आहे. आता**

ह्याला अंतरंगाचा स्वाद आला आहे, वास्तविक मोक्षमार्गाचे ज्ञान झाले आहे. रागवश बाहेर येतो परंतु पुन्हा स्वतःला सावधान करुन अंतरंगात जाण्याचा प्रयत्न करतो, पुन्हा बाहेर येतो, पुन्हा आत जाण्याचा पुरुषार्थ करतो. असे करत-करतच ह्याचा अंतरंगात रहाण्याचा काळ क्रमशः वाढू लागतो आणि बाहेर जाणे, परामध्ये उपयोगाचे जाणे, घटू लागते.

अशाप्रकारे एक दिवस हा स्वरुपामध्ये पूर्णतः स्थित होतो. उदा. एखाद्या मुलाला तोंडात बोट घालण्याची/चोकण्याची सवय पडली. वारंवार समजावले असता देखील त्याच्या लक्षात येत नाही की ही वाईट सवय आहे आणि जोपर्यंत त्याच्या स्वतःच्या लक्षात येत नाही की मला हे सोडले पाहिजे तोपर्यंत तर त्या सवयीचा सुटण्याचा प्रश्नच उभा रहात नाही. एके दिवशी वारंवार ऐकून ऐकून त्याच्या लक्षात आले की ही सवय खूप वाईट आहे. आता तो ह्या विषयी खास सावधानी (दक्षता) बाळगतो की तोंडात बोट जाऊ नये, परंतु जरा बेसावध झाला की ते पुन्हा संवयीनुसार तोंडात जाते. पुन्हा सावध होऊन बोट बाहेर काढतो आणि तत्संबंधी सावधगिरी वाढविण्याचा निरंतर पुरुषार्थ करतो. असे करता करता, एके दिवशी त्याला लक्षात येते की आता पूर्ण जागृती झाली आहे, आता बोट तोंडात बिलकुल जात नाही, आता संवय पूर्णपणे सुटलेली आहे.

अशाप्रकारे ज्ञानीची देखील स्वरुपामध्ये रमणता वाढत-वाढत कषाय कमी होऊ लागतात व पूर्वसंचित कर्मांची निर्जरा होत जाते. आत्मोन्नतीच्या ह्या क्रमाला आगमामध्ये चौदा गुणस्थानांच्या माध्यमातून समजावलेले आहे.

चौदा-गुणस्थान : जेव्हा हा जीव स्व-परभेदविज्ञान करतो, द्रव्यकर्म-भावकर्म नोकर्माहून भिन्न आपल्या स्वतःला ज्ञाता-दृष्टा चैतन्यरुप अनुभव करतो, तेव्हा पहिल्या गुणस्थानातून ह्याला चौथे गुणस्थान मिळते. तेथे अंतरंगामध्ये तर अनंतानुबंधी कषाय आणि मिथ्यात्वाचा अभाव असतो, तसेच बाह्यामध्ये अन्याय-अभक्ष्य-अनाचाररुप प्रवृत्तींचा अभाव असतो. **खरे वीतरागी देव-शास्त्र-गुरुच पूजनीय आहेत, अन्य नाहीत, अशी श्रद्धा असते.**

ह्या भूमिकेमध्ये आत्मानुभव कमीत कमी सहा महिन्यांमध्ये एकदा अवश्य होतो, अन्यथा चौथे गुणस्थान रहात नाही. येथे साधक जेव्हा आत्मानुभवाला लवकर लवकर प्राप्त करण्याचा पुरुषार्थ करतो तेव्हा ह्याचे अप्रत्याख्यानावरण कषाय मंद होऊ लागतात. जेव्हा हा कमीतकमी पंधरा दिवसामध्ये एक वेळ आत्मानुभव होण्याची योग्यता बनवितो, तेव्हा अंतरंगामध्ये तर अप्रत्याखानाचा अभाव होतो आणि बहिरंगामध्ये

अणुव्रतादिक बारा व्रतांचे धारण तसेच अकरा प्रतिमानुरुप आचरण क्रमाने सुरु होते. येथवर गृहस्थ अवस्था आहे-पाचवे गुणस्थान आहे.

येथे साधक अभ्यासाद्वारे आत्मानुभवाची वेळ वाढवितो आणि अंतराल (दोन अनुभवातील अंतर) कमी करीत जातो. त्यामुळे फलस्वरुप प्रत्याख्यानावरण कषाय मंद पडू लागतात आणि अभ्यास करता करता जेव्हा ह्याची **अंतर्मुहूर्तामध्ये एक वेळा आत्मानुभव होण्याची योग्यता बनते, तेव्हा अंतरंगामध्ये प्रत्याखानावरणाचा अभाव होतो आणि बहिरंगामध्ये अठ्ठावीस मूलगुणांचे पालन तसेच नग्न दिगंबर मुनीअवस्थेनुरुप आचरण होऊ लागते. येथे जेव्हा साधक आत्मानुभवापासून दूर होतो तेव्हा मूलगुणांच्या पालनरुप प्रवृत्तीमध्ये अथवा स्वाध्याय, चिंतन वगैरे मध्ये जोडला जातो. येथे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की जर ह्या साधकाला अंतर्मुहुर्ताच्या आत आत्मानुभव झाला नाही, तर तो सहाव्या गुणस्थानातून पाचव्यामध्ये येतो –**

जरी बाह्य आचरण अजूनही मुनी अवस्थेचेच आहे. तरी प्रत्याख्यानावरण कषायांचा पुन्हा उदय होतो. जर पुन्हा पंधरा दिवसापर्यंत देखील आत्मानुभव झाला नाही तर तो चौथ्या गुणस्थानात येतो आणि जर सहा महिन्यापर्यंत देखील आत्मानुभव झाला नाही तर पहिल्या गुणस्थानातच पोहोचतो. तिसरे व दुसरे गुणस्थान जीवाचे चौथ्यातून पहिल्यामध्ये पडत असताना होतात. पुनश्च जर स्वतःचे स्वतःला सावरले तर पुन्हा वरच्या गुणस्थानात चढण्याची शक्यता असते.

सहाव्या गुणस्थानात जेव्हा आत्मानुभव होतो तेव्हा तर सातवे गुणस्थान होते. जर त्या आत्मानुभवातून न पडता हा साधक ध्यानातील लीनता वाढवेल तर सातव्यातून आठवे-नववे-दहावे ही गुणस्थानं होतात. तेथे अंतरंगात संज्वलन कषाय तीव्र पासून मंद, मंदतर व मंदतम होत जातात आणि ध्यानस्थ अवस्था चालू रहाते, ज्याला शुक्लध्यान म्हटलेले आहे. आठव्या, नवव्या व दहाव्या गुणस्थानामध्ये ध्यानस्थ अवस्था असताना त्यामध्ये दृढता (गहनपणा) उत्तरोत्तर वाढत जाते. सातव्यामध्ये डुबकी मारीत होता आणि पुन्हा बाहेर येत होता. आठव्यामध्ये आत डुबत जातो परंतु अजून पृष्ठभागावर बुडबुडे येत आहेत. आणखीन अधिक खोलात जातो तेव्हा बुडबुडे देखील बंद होतात.

आत्मध्यानाच्या दृढतेच्या फलस्वरुप सूक्ष्मलोभाचादेखील अभाव होऊन कषायरहित बारावे गुणस्थान होते. ह्यानंतर शुक्लध्यानाच्या दुसऱ्या टप्प्याद्वारे आत्म्याच्या ज्ञान-दर्शन-सुख-वीर्य यांच्या अनंतपणाला, पूर्ण विकासाला प्राप्त

होतो, तेरावे गुणस्थान होते. येथे शरीराचा आणि शरीरासंबंधी कर्म-प्रकृतींचा संबंध अजून बाकी आहे. **येथे कोणत्याही प्रयत्नाशिवाय-इच्छेशिवाय-मेघगर्जनेसमान सहज स्वाभाविकपणे, वाणी खिरते. ज्यामुळे प्राणीमात्रांना आत्मकल्याणाचा, अनंत दुःखापासून सुटण्याचा आणि परमात्मा बनण्याचा मार्ग सापडतो.** पुन्हा शुक्लध्यानाचा टप्पा बदलतो. तिसऱ्या टप्प्यापासून योगनिरोध करीत चौदाव्या गुणस्थानात प्रवेश करतो आणि मग चौथ्या शुक्लध्यानाद्वारे शरीररहित होऊन सच्चिदानंद परमात्मा होतो.

गुणस्थानांच्या ह्या परंपरेमध्ये एक महत्वपूर्ण गोष्ट ही आहे की, अध्यात्म, करणानुयोग व चरणानुयोग ह्या तिघांचे कार्य एकत्र एकावेळीच चालू असते. चेतनेमध्ये जोडले जाणे, कषायांचे घटणे, आणि आचरण बदलणे - या तिन्ही गोष्टी एका वेळी होतात.

ज्ञातापणाची सहज क्रिया

ज्ञानी वारंवार अनुभूती करण्याचा नव्हे तर ज्ञातारुप राहण्याचाच पुरुषार्थ करतो. त्याला मी ज्ञाता आहे, मी ज्ञाता आहे, असा विकल्प करावा लागत नाही. दीपक जळत आहे, तो हा विकल्प करीत नाही की 'मी' प्रकाश करीत आहे, मी एवढ्या पदार्थांना प्रकाशित केले, आता चक्रवर्ती आले होते, त्यांना देखील मी प्रकाशित केले होते वगैरे. त्याचे तर अस्तित्वच हे व्यक्त करीत आहे की तो मात्र प्रकाशरुपच आहे.

अशातऱ्हेने ज्ञानीला देखील ज्ञातापणाची नैसर्गिक स्वाभाविक अवस्था असते, तो सर्वांना जाणतो. तो वारंवार ज्ञातापणापासून हटतो (दूर होतो), मनाशी जोडला जातो, विचार चालू होतात, परंतु पुन्हा स्वतःला फटकारतो, सावध होतो आणि श्वासाला साक्षी राहण्याचा, शरीराच्या सर्व क्रिया-चालणे-फिरणे,उठणे-बसणे वगैरेंचा साक्षी राहण्याचा प्रयत्न करतो. साक्षीभूत रहात-रहात अनुभूती तर कधी आपणहूनच होते. अनुभूती व ज्ञातापणामध्ये फरक हाच आहे की अनुभूतीमध्ये फक्त एक मात्र चैतन्यच उरतो. मन, श्वास, शरीराच्या क्रिया वगैरे कशावरही दृष्टी रहात नाही. परंतु ज्ञातापणामध्ये अंतरंगात जाणणारा आणि बाहेर श्वास किंवा इतर शरीरिक क्रिया किंवा बोलण्याची क्रिया असे दोनच असतात. मन असत नाही. **जेथे ज्ञातापणा असेल तेथे मन तर असूच शकत नाही, कारण शक्ती तर तीच आहे जर ती मनामध्ये लावली गेली तर ज्ञातामध्ये कशी लावली जाईल!** शरीराची एखादी क्रिया किंवा श्वासाची क्रिया जाणण्याबरोबरही राहू शकते कारण ह्या क्रियांमध्ये चेतनेची फारच थोडीशी शक्ती लागते. परंतु मनाच्या विकल्पामध्ये तर अधिकात अधिक शक्ती खर्च होते.

ज्ञानी ज्ञानाचाच कर्ता

ज्ञानीचीसुद्धा ज्ञानधारा व कर्मधारा दोन्ही चालू असते. परंतु तो ज्ञानधारेचा मालक आहे. कर्मधारेचे कार्य होत आहे, परंतु ज्ञानी त्याचा जाणणाराच आहे, कर्ता नाही. कर्मधारेमध्ये त्याला अहंपणा नाही. ज्याप्रमाणे आपण दुसऱ्या व्यक्तीला पाहतो-जाणतो, त्याच्या क्रोधादिकाला देखील पाहतो आणि शारीरिक अवस्थांना देखील पाहतो, परंतु त्यारुप स्वतः होत नाही. तसेच हा देखील दूर उभे राहून कर्मधारा पाहतो, परंतु तिला आपलेरुप अनुभव करीत नाही. म्हणून आता ज्ञान आपलाच कर्ता-भोक्ता आहे, कर्माच्या कार्याचा कर्ता-भोक्ता नाही. सोन्यामध्ये जरी चांदी मिसळलेली असेल तरीदेखील ती शुद्ध सुवर्णाच्या अपेक्षेने तर खोटच म्हटली जाईल. त्या खोट विषयी असे म्हणणार नाहीत की ही चांदी आहे म्हणून थोडीफार चांगली आहे.

मोक्षमार्गामध्ये देखील शुद्ध सुवर्णाप्रमाणे फक्त शुद्ध आत्म्याला ग्रहण करण्याची अपेक्षा आहे. म्हणून हे नक्की झाले की कर्मच संसार आहे, भले मग ते कितीही उच्चकोटीचे असो, भले तीर्थंकर प्रकृतीच का न असो. "जेवढे ज्ञानरुप राहणे आहे तेवढा मोक्षमार्ग, जेवढे कर्म तेवढा संसार." ही वस्तुतत्त्वं ज्ञानी चांगल्यातऱ्हेने जाणत आहे. म्हणून आतापर्यंत जी शक्ती कर्माच्या कर्तृत्वामध्ये लावली जात होती, तीच आता ज्ञानामध्ये - कर्माचे कार्य जाणण्यामध्ये – लावली जात आहे. **म्हणून ज्ञानी केवळ ज्ञानाचा कर्ता झाला आणि त्याचाच भोक्ता म्हटला गेला. कर्म आणि कर्मफलांचा कर्ताभोक्ता राहिला नाही.**

द्रव्यदृष्टी - पर्यायदृष्टी

जो पर्यंत हा अज्ञानी होता तोपर्यंत आपल्या स्वतःला फक्त पर्यायरुपच पहात-जाणत होता, पर्यायदृष्टीचाच ह्याला एकांतपक्ष होता. द्रव्यस्वभावाचे ह्याला ज्ञानच नव्हते. वास्तविक आत्मा द्रव्य-पर्यायरुप आहे. म्हणून वस्तुचे सम्यक् सर्वांगिण ज्ञान नसल्याकारणाने हा मिथ्यादृष्टी म्हटला जात होता.

चेतन द्रव्यदृष्टीने त्रिकाल, शुद्ध आणि एक मात्र आहे. परंतु पर्यायदृष्टीने पाहिले असता अशुद्ध होत आहे, शरीर, कर्म वगैरे अनेक संयोगांना प्राप्त होत आहे. म्हणून जीवाला दोन्ही दृष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. वस्तुचा पर्यायरुप अनुभव तर हा अनादिकाळापासून करीतच आला आहे, वस्तुचा द्रव्यरुप अनुभव ह्याला झाला पाहिजे. आता आचार्यांच्या सम्यक् उपदेशाने जेव्हा द्रव्यस्वभावाचे ज्ञान करुन ह्याने

वस्तुचा द्रव्यरुप अनुभव केला तेव्हा ह्याचे ज्ञान यथार्थ झाले आणि हा ज्ञानी म्हटला गेला ह्याची पर्यायातील एकत्वबुद्धी सुटली.

द्रव्यदृष्टीच्या जोरावर भय, इच्छा व कषायांच्या प्रयोजनांचा अभाव : अज्ञानदशेमध्ये वस्तुला फक्त पर्यायरुपच पाहण्याने आकुलते शिवाय इतर काही ह्याच्या पदरी पडत नव्हते. सात भयांनी देखील हा निरंतर घेरलेला असायचा - मरणाचे भय, पुण्याच्या उदयामध्ये पापाचा उदय होण्याचे भय, सुखामध्ये दुःखी होण्याचे भय, मानसन्मान आहे तर अपमान होण्याचे भय वगैरे. इच्छा व कषाय करण्याचे प्रयोजनदेखील ह्याचे चालूच होते. सर्व गोष्टी सर्व तऱ्हेने अनुकूलच रहाव्यात ह्या गोष्टीची इच्छा होत असे आणि इच्छेची पूर्ती न झाल्यास क्रोधादी कषायरुपी परिणमित होत असे.

आता ज्ञानी झाल्यावर जेव्हा ह्याची द्रव्यदृष्टी जागृत झाली, ह्याने आपल्या स्वतःला ज्ञानरुप जाणले, निजभावरुप पाहिले, तेव्हा त्याला आढळले की मी तर एक मात्र चैतन्य आहे, बस्स, एवढाच आहे, असाच अनादिकाळापासून आहे अणि असाच अनंतकाळापर्यंत राहीन. जेव्हा स्वतःला असा अनुभव झाला तेव्हा भयादिक काहीही होण्याचा प्रश्न उरला नाही. इच्छा व कषाय करण्याचे प्रयोजनदेखील नाहीसे झाले. जेव्हा शरीरच माझे नाही आणि माझे मरण नाही तर मग मरणाचे भय कसले? आपले वैभव, निजात्म्याचे अनंत गुण आपल्या जवळ आहेत. ह्याव्यतिरिक्त इतर सांसारिक/ लौकिक वैभव आपले होऊच शकत नाही, तर मग वैभवाची इच्छा कशी होईल?

आपले सर्व आपल्यामध्ये आहे. चेतनेचे अनंतगुणच फक्त माझे आहेत, ते कोठे बाहेर जाऊ शकत नाहीत आणि बाहेरून त्यामध्ये काहीही येऊन मिसळणार देखील नाही. तर मग धन-कुटुंबादिकांची इच्छा कशी होईल? अशा प्रकारे माझे काही अनिष्ट होणे शक्य नाही, तेव्हा क्रोध कोणावर करावा? कोण माझ्याहून श्रेष्ठ-कनिष्ठ नाही, तर मग मान-अपमान कसला? काही इष्ट नाही तर राग कशावर करावयाचा? काही अनिष्ट नाही तर द्वेष कोणाशी? अशाप्रकारे निज-आश्रय घेणाऱ्यांना कषाय करण्याचादेखील अभिप्राय उरला नाही.

ज्याप्रमाणे एखादा दिवा एखाद्या झोपडीमध्ये जळत आहे. जर त्याने स्वतःला दिवारुप न समजता झोपडीरुप मानले तर त्याला त्या झोपडीच्या नाशाचे निरंतर भय वाटत राहील. झोपडीसंबंधी हजारो चिंता आणि इच्छा त्यामध्ये जन्म घेतील. महाल, प्रासाद वगैरेंमध्ये जळत असणाऱ्या इतर

दिव्यांशी द्वेष होईल. तसेच स्वतःमध्ये देखील महालात जाण्याचा राग उत्पन्न होईल. परंतु जर तो स्वतःला झोपडीरुप न मानता, आपल्यारुप-दिवारुपच-मानेल तर न तर झोपडीसंबंधी कोणते भय किंवा चिंता उरेल आणि न महालात जाण्याची इच्छा होईल/आणि न महालातल्या दिव्यांविषयी द्वेष होईल. तो तर स्वतःला फक्त झोपडीला प्रकाशित करणारा, जाणणाराच मानेल परंतु त्यारुप म्हणजेच झोपडीरुप मानणार नाही.

पर्यायीतील साऱ्या उणीवा आपल्या, आणि ज्ञातारुप राहण्याने त्यांचा अभाव : ज्ञानीची द्रव्यदृष्टी जागृत झाली आणि तो स्वतःला ज्ञानरुपच पहात-जाणत आहे. द्रव्यदृष्टीने तर तो ज्ञाताच आहे आणि जोपर्यंत साधकरुप अवस्था आहे तोपर्यंत ज्ञानरुप राहण्यालाच आपले कार्य समजतो. **परंतु द्रव्यदृष्टीचा देखील एकांत पक्ष ग्रहण करीत नाही-पर्यायाला देखील जाणतो आणि पर्यायामध्ये जेवढ्या उणीवा आहेत त्याला आपली दुर्बलता व चूक मानतो.** पर्यायदृष्टीमध्ये विकारापासून दूर होऊ इच्छितो तसेच वारंवार द्रव्यस्वभावाचे अवलंबन घेऊन आपल्या त्या दुर्बलतेला दूर करण्याचा पुरुषार्थ करतो. ज्ञाता बनताच विकार दूर होऊ लागतात. क्रोधाचा ज्ञाता होताच क्रोधाचा अभाव होऊ लागतो, तो अदृश्य होतो. काम-वासनेचा ज्ञाता होताच तिचा अभाव होऊ लागतो, ती बर्फाप्रमाणे विरघळू लागते. विकार व वासना तर चेतनेच्या सहकार्यामुळेच फोफावतात आणि जेव्हा चेतना सहकार्य करीत नाही तेव्हा ते नष्टप्राय होतात. **द्रव्यदृष्टीने तर आत्मा त्रिकाल शुद्ध आहेच पर्यायात अशुद्ध होता आणि ती पर्यायाची अशुद्धता, त्या शुद्ध द्रव्याच्या निरंतर अनुभवाने कमी होत होत एक दिवस समाप्त होते आणि तेव्हा पर्यायदेखील शुद्ध झाल्याने द्रव्य पूर्णपणे शुद्ध होते.**

दोन्ही दृष्टींचे ज्ञान :

"जीव शुद्धतेकरिता पुरुषार्थ करतो" – ही गोष्टदेखील पर्यायदृष्टीने सांगितली जाते. द्रव्यदृष्टीने तर तो त्या पुरुषार्थाचा देखील ज्ञाताच आहे, त्या परिणतीचा देखील कर्ता नाही. द्रव्यदृष्टीने न त्याला इच्छांचा कर्ता म्हणतात आणि न कषायांचा! परंतु पर्यायीमध्ये अजून खूप दुर्बलता आहे, खूप पराधीनता आहे, म्हणून इच्छा आणि कषायांचा सद्‌भाव आढळतो.

द्रव्यदृष्टीच्या विषयाला पर्यायामध्ये आणि पर्यायदृष्टीच्या विषयाला द्रव्यस्वभावामध्ये मिसळणे योग्य नाही. द्रव्यदृष्टीने जीव फक्त ज्ञाता आहे आणि पर्याय दृष्टीने सारी जबाबदारी त्याची स्वतःची आहे. पर्यायामध्ये पश्चाताप देखील होत आहे की माझी अशी परिणती का झाली? **कर्मांचा**

नाश तर द्रव्यदृष्टीच्या बलानेच होईल. परंतु पर्यायदृष्टीच्या ज्ञानाच्या जोराने स्वच्छंदीपणा येणार नाही.

ज्ञानीचा पर्यायींमध्ये विवेक : ज्ञानी ज्ञानाचा मालक आहे, तो त्याशिवाय आणखीन काही देखील करु शकत नाही. परंतु अजून अपूर्ण अवस्था आहे, म्हणून पर्यायीमध्ये त्याला एवढा विवेक आहे की तीव्र कषायांपासून दूर होऊन तो मंद कषायरुप राहण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्या **मंदकषायरुप परिणतीला मोक्षमार्ग मानत नाही. रागाचेच कार्य आहे हे जाणतो.** आत्मबलाच्या दुर्बलतेमुळे जेव्हा निर्विकल्पपणा बनत नाही, इतर विकल्पांमध्येच जातो तरी देखील इतर लौकिक गोष्टींपासून दूर हटून खऱ्या देव-गुरु-शास्त्रांमध्येच जोडले जाण्याचा प्रयत्न करतो आणि लौकिक कार्यांमध्ये देखील तीव्र कषाययुक्त विकल्प न उभे करता, मंद कषायवाले विकल्पच करतो.

जसे, एखादी व्यक्ती जात आहे, त्याला पाहून आपण असा विकल्पदेखील करु शकतो की, 'मोठा माणूस झाला आहे, आता कशाला आमच्याकडे बघेल?' आणि असा देखील विचार करु शकतो की, 'घाईत असेल, म्हणून पाहिले नसेल.' प्रत्यक्षात पहिला विकल्प दुसऱ्या विकल्पाच्या अपेक्षेने अधिक कषाययुक्त आहे. म्हणून ज्ञानी दुसऱ्या प्रकारचाच विकल्प करेल. त्याची विचार करण्याची पद्धत अज्ञानींपेक्षा वेगळी होऊन जाते, कारण त्याला वस्तुतत्त्व समजले आहे की –

'परिस्थिती तर मला कषाय करायला लावत नाही, मी स्वतःच ज्ञातारुप न राहू शकल्यामुळे आपल्या असमर्थतेमुळे परिस्थितीशी जोडल्या कारणाने विकल्पामध्ये वहावत जातो आणि त्यामुळे फलस्वरुप स्वतःच आपल्या चेतनेचा घात करुन बसतो. म्हणून अपेक्षाकृत मंद कषायवाले विकल्प का न करावे? कारण त्यामुळे माझ्या आत्म स्वभावाचा कमी घात होईल.' द्रव्यदृष्टीने ज्ञानी ज्ञातारुपच रहाण्याचा पुरुषार्थ करतो परंतु पर्याय-दृष्टीने आपली दुर्बलता अजून वाढू नये, म्हणून बाह्य व्रत-तप वगैरे क्रियांचा देखील अंगीकार करतो. जसे, जर शरीरामध्ये १०२ डिग्री ताप आहे तर त्याकरिता दोन प्रकारचे प्रयत्न केले जातात - ताप आणखीन वाढू नये त्याकरिता पथ्य आणि जेवढा ताप आहे तो नाहीसा व्हावा म्हणून औषध घेणे.

त्याचप्रमाणे ज्ञानीदेखील जेवढा विकार आहे त्याला हटविण्याकरिता तर ज्ञातारुप राहतो आणि तो विकार अधिक वाढू नये म्हणून शरीराश्रित आणि पर्यायाश्रित व्रत, तप वगैरे क्रियादेखील करतो. परंतु त्या क्रियांमध्ये-देखील त्याला ममत्व असत नाही, जेव्हा शरीरामध्येच ममत्व उरले नाही

तर त्याच्या आश्रित क्रियांमध्ये ममत्व कसले? त्या क्रियांमध्ये तो ओढाताण देखील करीत नाही. जेव्हा पाहतो की इंद्रिय आणि मन चंचल होत आहेत, तेव्हा उपवास करतो आणि जेव्हा त्यांना शिथिल आहेत असे पाहतो - आपल्या ध्यान-अध्ययनात उणीवा आलेल्या पाहतो तेव्हा भोजन ग्रहण करतो.

सर्व परिवर्तन आणि आचरण स्वाभाविक : ज्ञानीला वस्तुस्वभाव अनुभवात आला आहे म्हणून त्याच्या जीवनामध्ये परिवर्तन निश्चितपणे येते आणि ते सारे परिवर्तन स्वाभाविकच होते. जर आपण असे म्हटले की परपदार्थ माझा नाही, परंतु अनुभवात हेच आले की, आहे तर माझाच, तर मग आपले जीवन बदलणार नाही आणि जरी बाह्यामध्ये काही परिवर्तन आढळले देखील तरी सुद्धा ते मुद्दाम आणलेलेच असेल, सहज आलेले नसेल. **खेचून-ताणून आणलेले आचरण वास्तविक (खरे) असत नाही - त्याकरिता निरंतर चिंता चालू असते.**

जसे एखादी स्त्री खूपच जास्त श्रृंगार करुन जात आहे. तिचे ते स्वाभाविक सौंदर्य नाही, म्हणून तिला वारंवार आरशात आपले तोंड न्याहाळावे लागते की कोठे काही बिघडलेले तर नाही, निरंतर तिला त्याचीच चिंता वाटत असते. परंतु ज्ञानीचे आचरण वरुन पांघरलेले नसते, त्याला वारंवार हे पहावे लागत नाही की कोठे काही चूक तर होत नाही ना? **सम्यग्दर्शनाची आठ अंग त्याला पाळावी लागावीत, असे होत नाही, उलट ती स्वतःच पाळली जातात. तो बाह्य पर-पदार्थामध्ये सुख-दुःख मानत नाही एवढेच नव्हे, तर उलट त्याला परपदार्थांमध्ये सुख-दुःखाचा भावच उत्पन्न होत नाही.**

बाह्य क्रियांवरुन ज्ञानी-अज्ञानीपणाचे माप नाही : जीवाच्या बाह्य दशेवरुन अथवा क्रियांवरुन त्याच्या ज्ञानी-अज्ञानीपणाचे माप केले जाऊ शकत नाही. असे होऊ शकते की अज्ञानीच्या क्रिया जास्त शुभ दिसून येत असतील आणि ज्ञानीच्या अशुभ! ज्ञानी-अज्ञानीपणाचा संबंध तर अंतरंगात ज्ञानाची जागृती अथवा मूर्च्छेशी आहे. बाह्यामध्ये ज्ञानी-अज्ञानी दोहोंच्या क्रिया एकसारख्या जरी दिसत असल्या तरी देखील अंतरंगामध्ये दोहोंच्या अभिप्रायांमध्ये महान अंतर आहे. ज्ञानी त्या क्रिया करु इच्छित नाही, त्याची त्यामध्ये रुची नाही, रुची तर त्याची फक्त ज्ञातारुप राहण्यामध्येच आहे.

कर्माच्या उदयामुळे जबरदस्तीने काम करणे आणि इच्छा ठेवून काम करणे ह्या दोन्हीमध्ये फार मोठा फरक आहे. एखाद्याने प्रथम भांग प्यायली आहे आणि आता त्याची नशा चढल्याने तो धुंदीत झुलत आहे. परंतु आता

तो ही इच्छा करेल की मला नशा चढू नये, तर ते शक्य नाही. ह्या ज्ञानीने **देखील अगोदर जी मोहरुपी भांग चढविली होती, तिचा नशा अजूनपर्यंत चढलेला आहे, अजूनही तो नशेत झुलत असलेला आढळून येतो. परंतु अंतरंगामध्ये त्या नशेला तो हेयच समजत आहे आणि इच्छादेखील हीच आहे की केव्हा ही नशा खलास होईल.** एक वेळ अशी अवश्य येईल की ह्याचा नशा खलास होईल आणि पुन्हा हा भांग पिणार नाही. तेव्हा कायमसाठी स्वस्थ होईल, 'स्व' मध्ये स्थिर होईल. परंतु हा नशा तर जेव्हा खलास होईल तेव्हा होईल, अजून तरी बाह्य अवस्था पाहणाऱ्यांना हा झुलत असलेलाच दिसून येत आहे. जे फार मोठे परिवर्तन ह्याच्यामध्ये आले आहे त्याला तर तो स्वतःच जाणतो. ती त्याच्या अंतरंगातील गोष्ट आहे, अजून ती बाहेर दिसणार नाही, बाहेर तर जेव्हा व्रती अथवा मुनी अवस्था होईल तेव्हाच ती प्रगट होईल.

वचेने सुद्धा ज्ञानी-अज्ञानीपणाचे माप नाही : अशाप्रकारे ज्ञानी-अज्ञानीपणाचा संबंध एखादी व्यक्ती तोंडाने काय बोलते, ह्याच्याशी देखील नाही. असे होऊ शकते की ज्ञानी तोंडाने शरीराला आपले म्हणेल, स्त्री-पुत्र वगैरेंना आपले म्हणेल, परंतु असे म्हणत असताना देखील त्याला ते 'पर' च दिसत आहेत आणि अज्ञानी तोंडाने भले त्यांना 'पर' म्हणत असेल की, हे माझे नाहीत, परंतु त्याला ते आपलेच दिसत आहेत.

जगामध्ये ह्याची उदाहरणंदेखील आढळतात - आपण दुसऱ्याच्या मुलाला घेऊन जात आहोत, रस्त्यात एखाद्याने विचारले - 'कोणाचा मुलगा आहे?' आपण म्हटले - 'आपलाच आहे' त्या मुलाला आपण आपलाच म्हणत आहोत परंतु तो आपला फक्त सांगण्यापुरताच आहे परंतु तो दुसऱ्याचा आहे हे दिसत आहे. तसेच एखादा आपला स्वतःचा मुलगा आहे, त्याच्याशी खूप मोठे भांडण-तंटा झाला आणि आपण म्हटले की आजपासून तुझा माझा कोणताही संबंध नाही आणि तो वेगळासुद्धा राहू लागला. तोंडाने काहीही म्हटलेले असो परंतु मन तर वारंवार हेच सांगत असते की त्याला काहीही म्हणू दे, आहे तर आपलाच ना? आणि समजा दुसऱ्या दिवशी एखाद्या दुर्घटनेमध्ये तो खूप जखमी झाला तर विचारपूस करण्यासाठी त्याच्या घरी पोहोचतील. किंवा असेही होऊ शकते की तीव्र कषायवश जाणार देखील नाही. परंतु सतत त्याचेच ध्यान चालू राहील. लौकिक गोष्टींमध्ये जेव्हा हे शक्य आहे तर परमार्थामध्ये का नाही? **ज्ञानी वचनाने व कायेने लौकिक व्यवहार चालवितो परंतु त्याचे मन तर चेतनेशीच जोडलेले असते.**

संसार नाटकवत : ज्ञानीचे मन निरंतन चेतनेशीच जोडलेले असते, म्हणून हा संसार त्याच्या करिता नाटकाची रंगभूमी (Stage) होऊन जाते आणि स्वतःला तो नाटकाचे एक पात्र म्हणून पाहू लागतो. नाटकामध्ये ज्यावेळी नट अभिनय करीत आहे, त्यावेळी तो स्वतः आपल्या त्या अभिनयाचा दर्शक (पाहणारा) देखील असतो. अभिनय करीत असताना देखील तो सारखे हे जाणत आहे की हा अभिनय आहे. तेथे देखील दोन धारा एकत्र चालू आहेत. आपण म्हणू शकतो की तो रडत असताना देखील रडत नाही आणि हसत असताना देखील हसत नाही. तो भले गरीबाचा अभिनय करीत असेल अथवा श्रीमंताचा, प्रेक्षकांना आपल्या त्या भूमिकेचे सुख-दुःख दाखवीत असताना देखील तो वास्तवात सुख-दुःखी होत नाही कारण आपल्या खऱ्या रुपाचे त्याला ज्ञान आहे. अभिनय करीत असतानादेखील सतत आपले खरे रुप त्याच्या लक्षात आहे. त्याला तो विसरला नाही, विसरु शकत देखील नाही आणि त्याला जर म्हटले की तू ज्याचा अभिनय करीत आहेस, त्यारुपानेच आपल्या स्वतःला वास्तवात पाहू लाग तर तो हेच उत्तर देईल की ही तर अशक्य कोटीतील गोष्ट आहे, कोणत्याही परिस्थितीत हे होऊ शकत नाही.

हीच अवस्था त्या सम्यग्दृष्टी ज्ञानीची आहे, त्याला आत्म्याचा अनुभव झाला, आपल्या खऱ्या स्वरुपाचे ज्ञान झाले म्हणून बाकी सर्व नाटक दिसू लागले. आता त्याला अभिनय करावा लागत आहे कारण अजून तो 'स्व' मध्ये पूर्णपणे स्थिर होण्यामध्ये असमर्थ आहे. परंतु ह्या समस्त अभिनयामध्ये तो जाणत आहे की ह्यामध्ये आपले काहीही नाही. उपयोग भले त्याचा बाहेर जावो, परंतु अंतरंगात तर श्रद्धेचा बोर्ड सतत टांगलेलाच असतो की मी एकमात्र चेतन आहे. जर त्याला असे म्हटले गेले की तू ह्या शरीराला अथवा कर्माला आपल्यारुपाने पहा. तर तो म्हणेल - 'कसे पाहू? **जेव्हा मी त्यारुपाने नाहीच तर त्यारुपाने स्वतःला पाहणे तर सर्वथा असंभवच आहे. मी तर आता आपल्यालाच आपलेरुप पाहू शकतो.'**

ज्याप्रमाणे नाटकानंतर नट आपल्या अभिनयाच्या वेषाला उतरवून भिरकावून देतो, आपल्या अस्सल रुपामध्ये परत येतो आणि लवकरच आपल्या घरी जाण्याची त्याला बुद्धी होते. **त्याप्रमाणे ज्ञानीदेखील पूर्ण दिवस संसाराचे नाटक करुन सामायिकाच्या वेळी आपल्या सांसारिक वेषाला उतरवून फेकून देतो, हा शरीररुप जो वेष धारण केला आहे, त्याला देखील स्वतःपासून भिन्न करुन आपल्या खऱ्या स्वरुपाला प्राप्त करतो आणि मग**

आपल्या घरी गेल्याशिवाय त्याला चैन पडत नाही. म्हणून तो निज शुद्धात्म्यामध्ये रमणता करतो, त्यातच स्वतंत्ररुपाने विहार करतो.

कल्याण करणाऱ्या शास्त्रांची रचना करणाऱ्या त्या भगवान आचार्यांच्या अंतरंगामध्ये करुणेचा कसला समुद्र वहात असेल की कोणत्याही प्रकाराने ह्या जीवाने आपल्या अनादी मिथ्यात्वाला सोडून, सम्यग्दर्शनाला, ह्या निर्विकल्प स्वानुभवाला प्राप्त करावे. **निर्विकल्प स्वानुभव चौथ्या गुणस्थानात होऊ शकतो, कारण चौथे गुणस्थान अविरत सम्यग्दृष्टीचे असते आणि निर्विकल्प स्वानुभूतीशिवाय सम्यग्दर्शन होत नाही.** काही लोक असे मानतात की चौथ्या गुणस्थानामध्ये निर्विकल्प स्वानुभूती होत नाही, कारण ते सांगतात की शास्त्रामध्ये तर आठव्या गुणस्थानापासून निर्विकल्प समाधि लिहीली आहे. शास्त्रामध्ये असे कथन आहे, ही गोष्ट सत्य आहे. परंतु कोणत्या अपेक्षेने ते लिहिले गेले आहे, ते तर आपणास समजलेच पाहिजे.

कारण **चतुर्थ गुणस्थानामध्ये निर्विकल्प-अनुभूती होते हे कथन देखील शास्त्राचेच आहे. शास्त्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतींची कथनं आढळतात. त्यामध्ये आचार्यांच्या अपेक्षा लक्षात घेऊन आपणास बुद्धीमध्ये त्यांचा ताळमेळ बसविला पाहिजे, ज्यायोगे कोणताही पूर्वापार विरोध रहाणार नाही. चौथ्या गुणस्थानामध्ये निर्विकल्प-अनुभूती त्यांनी कशी सांगितली, ह्याचा खुलासा हाच आहे की, विकल्प दोन प्रकारचे असतात - एक तर बुद्धिपूर्वक आणि दुसरे अबुद्धिपूर्वक. जे जीवाच्या पकडीमध्ये (लक्षामध्ये) येतात त्याला बुद्धिपूर्वक आणि जे त्याच्या पकडीबाहेर आहेत, त्यांना अबुद्धिपूर्वक म्हणतात. चौथ्या गुणस्थानात स्वानुभवाच्या वेळी जीवाचे बुद्धिपूर्वक कोणतेही विकल्प असत नाही, म्हणून त्याच्या स्वानुभूतीला निर्विकल्प अनुभूती म्हटले आहे.** आणि जर आपण त्या आनंदास्वादीला विचारले, तर तोदेखील हेच सांगेल की 'खरोखरच माझी त्या वेळी निर्विकल्प अवस्था होती. कोणताही विकल्प मला नव्हता.' आता तो आत्मज्ञानी आहे, छद्मस्थ आहे आणि त्याच्या पकडीमध्ये येण्यायोग्य जे सर्व बुद्धिपूर्वक विकल्प आहेत, त्यांचा त्या वैळेला अभाव झालाच आहे, म्हणून त्याच्या अपेक्षेने हे कथन सत्य आहे. परंतु एखाद्या महान ज्ञानीला, केवलज्ञानीला त्याच वेळेला जर आपण विचारले तर ते म्हणतील – 'आताच निर्विकल्पता कोठे? अजून तर अनंत अबुद्धिपूर्वक विकल्प ह्याचे बाकी आहेत. कषायांच्या तीन चौकडी बाकी आहेत फक्त अनंतानुबंधी तर गेली आहे. आम्हीतर आठव्या गुणस्थानामध्ये जेव्हा हा जीव श्रेणी मांडून शुक्लध्यान प्रारंभ करेल आणि अंतरंगात ह्याची लीनता

वाढेल, तेव्हा ह्याला निर्विकल्प समाधिस्थित म्हणू. अशा प्रकारे ह्या कथनांना जर आपण नीट समजून घेतले तर सर्व गोष्टी स्पष्ट होतात.

उदाहरणार्थ – समजा की आपण एका ठराविक ठिकाणी उभे राहून दूर क्षितीजाकडे जाणाऱ्या एका व्यक्तीला पहात आहोत. एक वेळ अशी येईल की तो अस्पष्ट होत होत आपल्याला दिसण्याचे बंद होईल. तेव्हा आपण असेच म्हणू की ती व्यक्ती आता राहिली नाही. परंतु हे कथन आपल्या ज्ञानाच्या अपेक्षेनेच सत्य आहे. वास्तविक पाहिले तर दूर क्षितीजावर त्या व्यक्तीचा सद्भाव-कोठे ना कोठे अवश्य आहे. तसेच एखादी दुसरी व्यक्ती ज्याची दृष्टी आपणापेक्षा जास्त तीक्ष्ण आहे, त्याला त्या वेळी देखील पाहून हेच म्हणेल की, 'चालत तर जात आहे तो, निषेध कसा करीत आहात तुम्ही त्याचा? अशाप्रकारे भिन्न-भिन्न कथनं भिन्न-भिन्न व्यक्तींच्या अपेक्षेने सत्य होऊ शकतात. **म्हणून चतुर्थ गुणस्थानामध्ये निर्विकल्प स्वानुभवाचा सर्वथा निषेध करणे मोक्षमार्गाचाच निषेध करणे आहे. चौथ्या गुणस्थानामध्ये स्वानुभूती होते आणि अतींद्रिय आनंदाचे प्रत्यक्ष वेदन होते. तो आनंद 'मी' शुद्ध आहे, बुद्ध आहे, निरंजन आहे, निर्विकार आहे' - अशा प्रकारच्या विकल्पांपासून उत्पन्न होत नाही. परंतु आत्मवस्तुच्या प्रत्यक्ष स्वादाने उत्पन्न होतो. त्याची महिमाच काही खास आहे, वेगळी आहे.** कल्पना करुन देखील जर पाहिले की एखाद्या वेळी आपण असेच शून्यात टक लावून बसलो आहोत आणि कोणताही विकल्प करीत नाही, तरी देखील केवढी शांती मिळते. वास्तविक त्यावेळेस बुद्धिपूर्वक व अबुद्धिपूर्वक लाखो विकल्प उभे राहतात. परंतु ज्यावेळी कोणता बुद्धिपूर्वक विकल्प उरत नाही त्यावेळी किती शांती मिळत असेल? ते वर्णनातीत आहे.

वस्तु विचारत ध्यावतै, मन पावै विश्राम।
रस स्वादत सुख उपजै, अनुभौ याकौ नाम॥
अनुभौ चिन्तामणि रतन, अनुभौ है रस कूप।
अनुभौ मारग मोख को, अनुभौ मोख स्वरुप॥

म्हणून सार हाच आहे की एकच रोग आहे - रागद्वेषाचा! आणि एकच इलाज आहे स्वानुभवाचा!! अथवा असे म्हटले पाहिजे.

संसारी जीवात्मा वजा कषाय बरोबर परमात्मा! जेवढे कषाय तेवढे परमात्म्यापासून दूर! आणि जेवढा कषायांचा अभाव तेवढे परमात्म्याच्या जवळ !! कषायांचा सर्वथा अभाव म्हणजेच परमात्मपणा!!!

आपल्या मध्ये पहा आणि जाणा, आपण कोठे उभे आहोत?

ॐ